रायगड, नवी मुंबई

# राम प्रहर

◆ वर्ष १६ ◆ अंक २०७
www.ramprahar.com

मंगळवार, १३ फेब्रुवारी २०२४ ◆ पाने ८ ◆ किंमत ₹ २

अंतरंग

अलिबागमधील सीसीटीव्ही कॅमेरे कार्यान्वित/२
खोपोली पालिका रुग्णालयाचा होणार कायापालट/५
राष्ट्रीय सायकलिंग स्पर्धेत स्नेहल माळीला 'सुवर्ण'/८

## इंडिया आघाडीला धक्का; रालोद पक्ष एनडीएमध्ये

**नवी दिल्ली** : राष्ट्रीय लोक दल (रालोद) या पक्षाचे अध्यक्ष जयंत चौधरी यांनी इंडिया आघाडीला



अलविदा केला आहे. चौधरी यांनी आपण आघाडीतून बाहेर पडत असल्याची घोषणा केली तसेच त्यांच्या पक्षाने एनडीए (राष्ट्रीय लोकशाही आघाडी)मध्ये सहभागी होण्याचा निर्णय घेतला आहे. महाराष्ट्रात माजी मुख्यमंत्री अशोक चव्हाण यांनी काँग्रेसच्या प्राथमिक सदस्यत्वाचा आणि आमदारकीचा राजीनामा दिल्याची बातमी ताजी असतानाच उत्तर प्रदेशात काँग्रेससह इंडिया आघाडीला मोठा धक्का बसला आहे. रालोदचे अध्यक्ष जयंत चौधरी यांनी सोमवारी (दि.१२) पक्षातील वरिष्ठ नेते, आमदार आणि पदाधिकाऱ्यांची बैठक बोलावली होती. या बैठकीनंतर त्यांनी एनडीएत सहभागी होणार असल्याची घोषणा केली. पक्षाचे सर्व आमदार, नेते, पदाधिकारी आणि कार्यकर्ते आमच्याबरोबर आहेत, असे त्यांनी सांगितले.

# काँग्रेसमध्ये भूकंप

## महाराष्ट्राचे माजी मुख्यमंत्री अशोक चव्हाण यांचा राम राम!



**मुंबई : प्रतिनिधी**

महाराष्ट्रातील काँग्रेसचे वरिष्ठ नेते आणि माजी मुख्यमंत्री अशोक चव्हाण यांनी पक्षाच्या प्राथमिक सदस्यत्वाचा आणि आमदारकीचा (विधानसभा सदस्यत्व) राजीनामा दिला आहे. यानंतर चव्हाण यांनी प्रसारमाध्यमांना प्रतिक्रिया देत आपली भूमिका मांडली.

या वेळी अशोक चव्हाण म्हणाले की, मी विधानसभा अध्यक्षांना भेटून काँग्रेस पक्षाच्या विधानसभा सदस्यत्वाचा राजीनामा दिला आहे, तर प्रदेशाध्यक्षांना काँग्रेस पक्षाच्या प्राथमिक सदस्यत्वाचा राजीनामा दिला आहे. काँग्रेसमध्ये असताना नेहमीच प्रामाणिकपणे काम केले. मला कोणाबद्दल कसलीही तक्रार करायची नाही तसेच राजीनामा देण्यामागे कुठलीही व्यक्तीगत भावना नाही. माझी पुढची राजकीय दिशा काय असेल याबाबत निवेदन निश्चित करेन. एक ते दोन दिवसांत तुम्हाला सर्वकाही सांगेन.

काँग्रेस सोडण्याबाबत प्रश्न विचारल्यावर अशोक चव्हाण म्हणाले, प्रत्येक गोष्टीला काही कारण असलेच पाहिजे असे नाही. मी जन्मापासून काँग्रेसचे काम केले आहे. आता मला वाटले अन्य पर्याय पाहिले पाहिजेत म्हणून राजीनामा दिला आहे. काँग्रेस सोडणे हा माझा वैयक्तिक निर्णय आहे.

### काँग्रेसचे अनेक नेते आमच्या संपर्कात –उपमुख्यमंत्री फडणवीस

अशोक चव्हाण भाजपमध्ये प्रवेश करणार असल्याच्या चर्चा सुरू असतानाच उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी काँग्रेसमधील अनेक नेते आमच्या संपर्कात आहेत, असे सूचक वक्तव्य केले आहे.

उपमुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, अशोक चव्हाण भाजपमध्ये येत आहेत, हे तुमच्याकडूनच ऐकतोय. पण महाविकास आघाडीतील सगळ्याच पक्षांतील विशेषत: काँग्रेसमधील नेते आमच्या संपर्कात आहेत. काँग्रेसमधील मुस्कटदाबी आणि पंतप्रधान नरेंद्र मोदींच्या नेतृत्वातील भारताची प्रगती पाहता अनेक नेत्यांना वाटते की मुख्य प्रवाहात यायला हवे. मी इतकेच सांगेन, आगे आगे देखीए, होता है क्या!

### 'काँग्रेस छोडो यात्रा'

एकीकडे काँग्रेस नेते खासदार राहुल गांधी भारत जोडो यात्रेत पायी चालत पक्ष वाढवण्याचा प्रयत्न करीत आहेत, तर दुसरीकडे महाराष्ट्रात मात्र नेत्यांची काँग्रेस छोडो यात्रा सुरू झाली आहे. अशोक चव्हाण यांच्यासारखा मातब्बर नेता आणि माजी मुख्यमंत्री भाजपच्या गोटात जाणे काँग्रेस पक्षासाठी मोठा धक्का मानला जात आहे.

# नैना क्षेत्रात युडीसीपीआर लागू करण्याबाबत शासन सकारात्मक -मंत्री उदय सामंत

**नवी मुंबई : रामप्रहर वृत्त**

सिडको नैना परिक्षेत्रातील गावांना एकात्मिक विकास नियंत्रण आणि प्रोत्साहन नियमावली (युडीसीपीआर) लागू करण्याबाबत शासन सकारात्मक विचार करेल, असे आश्वासन राज्याचे उद्योगमंत्री तथा रायगड जिल्ह्याचे पालकमंत्री उदय सामंत यांनी सोमवारी (दि.१२) कोकणभवन येथे दिले.

सिडको अंतर्गत नैना परिक्षेत्रात शासनाकडून मंजूर युडीसीपीआरच्या तरतुदी तातडीने लागू करण्याची मागणी आमदार प्रशांत ठाकूर यांनी केली होती. त्या संदर्भात सीबीडी बेलापूर येथे कोकण भवन विभागीय आयुक्त कार्यालयात नैना परिक्षेत्रातील समस्यांबाबत सर्वपक्षीय बैठक बोलावण्यात आली होती. त्या वेळी मंत्री सामंत बोलत होते. या बैठकीस आमदार सर्वश्री प्रशांत ठाकूर, महेश बालदी, जयंत पाटील, महात्मा फुले सामाजिक प्रबोधन व परिवर्तन प्रतिष्ठानचे अध्यक्ष अतुल पाटील, माजी आमदार बाळाराम पाटील,




भाजपचे तालुका अध्यक्ष अरुणशेठ भगत, उद्योजक जे.एम. म्हात्रे, ठाकरे गटाचे जिल्हा सल्लागार बबन पाटील, शिवसेनेचे जिल्हाप्रमुख रामदास शेवाळे, भाजपचे तालुका उपाध्यक्ष संजय पाटील, सरचिटणीस राजेंद्र पाटील, भूपेंद्र पाटील, अनुसूचित मोर्चा जिल्हाध्यक्ष अमित जाधव, माजी नगरसेवक मनोहर म्हात्रे, शिवकर ग्रामपंचायतीचे सरपंच आनंद ढवळे, विचुंबे ग्रामपंचायतीचे सरपंच प्रमोद भिंगारकर, आकुर्ली ग्रामपंचायतीचे सरपंच सचिन पाटील, चिपळे ग्रामपंचायतीचे माजी सरपंच रमेश पाटील, युवा नेते राजेश पाटील, पळस्पे जिल्हा परिषद विभागीय अध्यक्ष अनेश ढवळे, भाजपचे नेरे जिल्हा परिषद विभागीय अध्यक्ष सुनील पाटील यांच्यासह संबंधित शासकीय अधिकारी उपस्थित होते. **(पान २ वर..)**

## भूमिपुत्र भवनाला लोकनेते स्व. दि. बा. पाटीलसाहेबांचे नाव द्या

### आमदार प्रशांत ठाकूर व आमदार महेश बालदी यांची मागणी



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

उलवे नोडमध्ये उभारण्यात आलेल्या भूमिपुत्र भवनाला लोकनेते दिवंगत दि. बा. पाटीलसाहेबांचे नाव देण्यात यावे, अशी मागणी आमदार प्रशांत ठाकूर व आमदार महेश बालदी यांनी रायगड जिल्ह्याचे पालकमंत्री उदय सामंत यांच्याकडे केली आहे. या मागणीसंदर्भात मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याकडे विषय सादर केला जाईल, असे पालकमंत्री उदय सामंत यांनी आश्वासित केले.

प्रकल्पग्रस्तांचा बुलंद आवाज लोकनेते दिवंगत दि. बा. पाटील यांनी आपले सर्व जीवन भूमिपुत्र, प्रकल्पग्रस्तांच्या कल्याणाकरिता खर्ची केले आहे. आज त्यांच्यामुळे भूमिपुत्र ताठ मानेने जगत आहे. त्यांच्या प्रती कृतज्ञता म्हणून उलवे येथे सिडकोतर्फे बांधण्यात आलेल्या भूमिपुत्र भवनाला लोकनेते दि. बा. पाटील यांचे नाव देण्यात यावे आणि हे भूमिपुत्र भवन 'लोकनेते स्व. दि. बा. पाटील भूमिपुत्र भवन' या नावाने ओळखले जावे, जेणेकरून भूमिपुत्र भवन व लोकभावनेचा गौरव होईल, असे आमदार प्रशांत ठाकूर व आमदार महेश बालदी यांनी या मागणीच्या अनुषंगाने अधोरेखित केले आहे.

# मुंबई–गोवा महामार्गाच्या काँक्रीटीकरणाला वेग

## पळस्पे ते इंदापूर पहिला टप्पा मेअखेर होणार पूर्ण

**अलिबाग : प्रतिनिधी**

मुंबई–गोवा राष्ट्रीय महामार्गाच्या काँक्रीटीकरण कामाला वेग आला. रायगड जिल्ह्यातील पळस्पे ते इंदापूर या ८४ किलोमीटरच्या दोन्ही लेनचे काम ३१ मेपर्यंत पूर्ण होण्याचा दावा प्राधिकरणाकडून केला जात आहे.

२०१० साली मुंबई–गोवा महामार्गाच्या पहिल्या टप्प्यातील पळस्पे ते इंदापूर कामाला सुरुवात झाली होती. महामार्गामध्ये पळस्पे ते इंदापूर या ८४ किमीच्या पहिल्या टप्पाचे काम अनेक वर्ष रखडले होते. आता या महामार्गाच्या काँक्रीटीकरणाचे काम वेगात सुरू आहे. कोलाड, नागोठणे येथे मोठे पूल आहेत. या पुलांचे ब्रॅकेट्स आणि भरावाचे काम चालू आहे.



महामार्गाच्या कामाबाबत राष्ट्रीय महामार्ग विकास प्राधिकारणाचे प्रकल्प संचालक यशवंत घोटकर यांनी सांगितले की, पळस्पे ते इंदापूर हा सर्वांत डोकेदुखीचा टप्पा ठरला होता. गणपतीच्या कृपेने हा टप्पा ३१ मेपर्यंत पूर्ण होत आहे. कोलाड, नागोठणे अशा काही पुलांचे काम वेगाने सुरू आहे. या पुलांचे काम थोडेसे शिल्लक राहिल, परंतु गणेशोत्सवापूर्वी ते वाहतुकीसाठी सुसज्ज झालेले असतील. काही डांबरीकरणाचे टप्पे आहेत, तेदेखील पूर्ण केले जात आहेत.

## उरणमध्ये कंटेनर यार्डला भीषण आग

**उरण : प्रतिनिधी**

उरण तालुक्यातील कंटेनर यार्डात ट्रकला आग लागल्याची घटना सोमवारी (दि.१२) घडली. ट्रकचा टायर फुटल्याने लागलेल्या भीषण आगीचे धूर आकाशाला भिडले होते. आगीच्या घटनेनंतर परिसरातील कर्मचाऱ्यांमध्ये एकच घबराट पसरली.

जीडीएल सीएफएस कंटेनर यार्डातील ट्रकला सोमवारी सायंकाळी ही आग लागली. या आगीमुळे परिसरात धुराचे लोट पसरले. आग लागल्याचे कळताच परिसरात उपस्थित नागरिकांनी अग्निशमन दलाच्या जवानांना तातडीने माहिती दिली. ही माहिती मिळताच जेएनपीटीचे अग्निशमन दलाचे जवान तातडीने घटनास्थळी पोहचले. त्यानंतर त्यांनी अथक प्रयत्न करीत आगीवर नियंत्रण मिळवले.




**पनवेल : मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि मावळचे खासदार श्रीरंग बारणे यांच्या वाढदिवसानिमित्त कळंबोली येथे चला हवा येऊ द्या हा हास्याचा सदाबहार कार्यक्रम रविवारी आयोजित करण्यात आला होता. या कार्यक्रमाला माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर, आमदार किरण पावसकर, पोलीस उपायुक्त विवेक पानसरे, डीडीएसआर बिल्डरचे राहुल हजारे, आयोजक शिवसेना जिल्हाप्रमुख रामदास शेवाळे आदी उपस्थित होते. या वेळी मान्यवरांनी खासदार बारणे यांना शुभेच्छा दिल्या.**

## माघी गणेशोत्सवाचा रायगडात उत्साह

**अलिबाग : प्रतिनिधी**

रायगड जिल्ह्यात माघी गणेशोत्सवाची तयारी अंतिम टप्प्यात आली आहे. जिल्हा पोलीस अधीक्षक कार्यक्षेत्रात मंगळवारी (दि. १३) एकूण ४१५ गणेशमूर्तींची प्रतिष्ठापना होणार आहे, तर ५८ ठिकाणी सार्वजनिक माघी गणेशोत्सव साजरा होणार आहे. यानिमित्त धार्मिक व सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे.



अलिबागच्या कुलाबा किल्ल्यातील ऐतिहासिक आंग्रेकालीन गणपती मंदिरात माघी गणेशोत्सव मोठ्या उत्साहात साजरा केला जातो. यंदादेखील भजन, पूजन, जन्मोत्सव, आरती अशा विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन आहे. पहाटे काकड आरतीने या उत्सवाची सुरुवात होईल.

अष्टविनायकांपैकी पालीचा बल्लाळेश्वर व महडचा वरदविनायक ही दोन स्थळे रायगड जिल्ह्यात आहेत. तेथील गणेश मंदिर तसेच मुरूड तालुक्यातील नांदगावचा सिद्धीविनायक, चिरनेरचा महागणपती, श्रीवर्धन तालुक्यातील दिवेआगरचा सुवर्णगणेश, कडावचा बालदिगंबर, जांभुळपाडा येथील सिद्धीगणेश, मुगवलीचा स्वयंभू गणेश अशा प्रमुख मंदिरांमध्येही माघी गणेशोत्सव साजरा केला जाणार आहे.



# रुग्णालये, वैद्यकीय महाविद्यालयांचा कायापालट करणार -मुख्यमंत्री शिंदे

## आशियाई विकास बँकेकडून चार हजार कोटींचे कर्ज मंजूर

**मुंबई : प्रतिनिधी**

आशियाई विकास बँकेने इतके दिवस प्रलंबित चार हजार कोटींचे कर्ज मंजूर केले असून त्यातून राज्यातील शासकीय रुग्णालय व वैद्यकीय महाविद्यालयांचा कायापालट केला जाणार आहे. पहिल्या टप्प्यात १२०० कोटी रुपये तत्वतः उपलब्ध करून देण्यास मान्यता दिली आहे. यातून आकांक्षित जिल्ह्यांमध्ये अद्ययावत आणि दर्जेदार जिल्हा रुग्णालये उभारावीत, असे निर्देश मुख्यमंत्री एकनाथ



शिंदे यांनी सोमवारी (दि.१२) सह्याद्री अतिथीगृह येथे झालेल्या बैठकीत दिले.

सुरुवातीला धाराशिव जिल्ह्यात सर्वसुविधायुक्त ५०० बेड्सचे अद्ययावत जिल्हा रुग्णालय उभारण्याची तत्काळ कार्यवाही करण्याच्या सूचनाही त्यांनी दिल्या.

या बैठकीस आरोग्य मंत्री तानाजी सावंत तसेच आशियाई विकास बँकेचे अधिकारी दूरदृश्य संवाद प्रणालीद्वारे उपस्थित होते. राज्य सरकारने आशियाई विकास बँकेने दिलेल्या सूचनांप्रमाणे प्रशासकीय सुधारणा केल्यामुळे हे प्रलंबित कर्ज मंजूर झाल्याचे प्रारंभी मित्रा संस्थेचे मुख्य कार्यकारी अधिकारी प्रवीण परदेशी यांनी सांगितले.

आशियाई विकास बँकेच्या या कर्जातून राज्यातील वैद्यकीय शिक्षणाचे तसेच आरोग्याच्या तृतीयक सेवेचे बळकटीकरण होणार आहे. मुख्यमंत्री शिंदे यांनीदेखील यापूर्वीच आरोग्य यंत्रणेत आमुलाग्र बदल घडवून आणण्याचे उद्दिष्ट असल्याचे सांगितले आहे.

### सुधारणांमुळे कर्ज मंजुरीचा मार्ग मोकळा

**आशियाई विकास बँकेने इतके मोठे कर्ज मंजूर करण्यापूर्वी सात प्रशासकीय व शैक्षणिक सुधारणा सुचवल्या होत्या. यासंदर्भात सध्याच्या राज्य शासनाने वेगाने पाऊले उचलल्यामुळे कर्ज मंजुरी शक्य झाली असे बँकेचे टीम लीडर डॉ. निशांत जैन यांनी सांगितले. यामध्ये सेंटर ऑफ एक्सलन्स, डिजिटल मेडिकल एज्युकेशन आणि हेल्थ पॉलिसी तसेच ई-हॉस्पिटल, वैद्यकीय अधिकारी व कर्मचाऱ्यांना प्रोत्साहन, मालमत्ता नियोजन, व्यवस्थापन आणि शाश्वतता धोरण, उमेदवार भरती कक्ष, औषध खरेदी अधिकाराचे विकेंद्रीकरण अशा सुधारणा शासनाने केल्या.**

# पालीत माघी गणेशोत्सव सोहळा

## जत्रेत कोट्यावधींची उलाढाल; चोख बंदोबस्त

**पाली : प्रतिनिधी**

अष्टविनायक तीर्थक्षेत्र असलेल्या पालीत बल्लाळेश्वराचा माघ मासोत्सवाला शनिवारी (दि.१०) सुरुवात झाली आहे. पाच दिवस सुरू राहणाऱ्या या उत्सवाची सांगता बुधवारी (दि.१४) होणार आहे. दिवसभर धार्मिक विधी व कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. मंगळवारी गणेश जयंतीला लाखो भाविक बल्लाळेश्वराच्या दर्शनासाठी दाखल होतील. मोठी जत्रा भरली असून जत्रेत कोट्यावधींची उलाढाल होईल.

यानिमित्ताने देवस्थानच्या वतीने विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आल्याची माहिती देवस्थानचे अध्यक्ष जितेंद्र गद्रे यांनी दिली. मंगळवारी तुकाराम दैठणकर (पुणे) यांचे सनईवादन, अभिषेक आणि श्रींचा जन्मोत्सव कीर्तन होणार आहे. सायंकाळी श्रींचा पालखी सोहळा, महानैवेद्य, बुधवारी सकाळी ११ ते २ महाप्रसाद, रात्री ललीतानिमित्त कुसुम मनोहर लेले हे नाटक, उत्तररात्री लळीत (गुरुवारी पहाटे) असे कार्यक्रम होणार आहे. संपूर्ण सोहळ्यात राष्ट्रीय कीर्तनकार हभप संकेतबुवा भोळे यांचे सुश्राव्य कीर्तन होणार आहे.



### वाहतुकीच्या मार्गात बदल

**पालीत दाखल होणारी वाहने स्टेट बँक ऑफ इंडिया येथून येऊन राजीप व टॉपवर्थ शाळेच्या बाजूने भक्तनिवास क्रमांक १जवळून वळविण्यात आली आहेत, तर मंदिराजवळून येणारी वाहने याच मार्गावरून येऊन पुढे महाकाली हॉटेलजवळून हाटाळेश्वर चौकातून मिनिडोअर स्टँडजवळ पाली खोपोली मार्गावर वळवली आहे.**

### झेंडूच्या दरात वाढ

**अलिबाग :** माघी गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमिवर झेंडूच्या फुलांना मोठ्या प्रमाणात मागणी वाढल्याने फुलांच्या दरातही वाढ झाली आहे. असे असले तरी फुले खरेदीसाठी ग्राहकांनी गर्दी केली होती.

# अलिबाग शहरातील सीसीटीव्ही कॅमेरे कार्यान्वित

**अलिबाग : प्रतिनिधी**

अलिबाग शहरातील कायदा व सुव्यवस्थेच्या दृष्टीने शहरात ३२ ठिकाणी सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्यात आले आहेत. ही सीसीटीव्ही यंत्रणा सोमवारी (दि. १२) कार्यान्वित करण्यात आली. त्यामुळे अलिबाग शहरातील संशयास्पद हालचालींवर सीसीटीव्ही कॅमेऱ्याची २४ तास नजर राहणार आहे.

अलिबाग पोलीस ठाण्याच्या परिसरात सोमवारी आयोजित करण्यात आलेल्या समारंभात रायगडचे पालकमंत्री उदय सामंत यांच्या हस्ते अलिबाग सीसीटीव्ही कॅमेरा यंत्रणेचे लोकार्पण करण्यात आले. आमदार महेंद्र दळवी, जिल्हाधिकारी डॉ. योगेश म्हसे, राजिप मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. भारत बास्टेवाड, रायगड पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे, अप्पर



पोलीस अधीक्षक अतुल झेंडे, नगर परिषदेच्या मुख्याधिकारी अंगाई साळुंखे, पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक संजय पाटील आदी उपस्थित होते.

जिल्हा नियोजन विकास निधीतून नावीन्यपूर्ण योजनेंतर्गत अलिबाग शहरात सीसीटीव्ही कॅमेरा बसवण्यास मंजूरी देण्यात आली होती. यानुसार अलिबाग शहर आणि आसपासच्या ग्रामपंचायतीमध्ये ३२ ठिकाणी १२७ सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्यात आले. अलिबाग पोलीस ठाण्यात सुसज्ज कन्ट्रोल रूम उभारण्यात आली आहे. ज्यात एकाच वेळी ६४ कॅमेऱ्यांचे चित्रीकरण पोलिसांना पाहणे शक्य होणार आहे. शहरात प्रवेश करणाऱ्या आणि बाहेर जाणाऱ्या सर्व वाहनांची माहिती गाडी नंबरसह सॉफ्टवेअरच्या संकलित केली जाणार आहे. ज्याचा फायदा वाहतूक पोलीस आणि अलिबाग पोलिसांसाठी होऊ शकणार आहे. समुद्रकिनाऱ्यावरील हालचालींवर पोलिसांची नजर राहणार आहे. एक किमी परिसरातील हालचाली सीसीटीव्हीच्या माध्यमातून टिपता येणार आहे. या यंत्रणेमुळे शहरातील गुन्हेगारी कारवायांवर नजर ठेवणे, आरोपींचा शोध घेणे सुलभ होणार आहे.

**कायदा व सुरक्षितेच्या दृष्टीने सीसीटीव्ही कॅमेरे महत्त्वाचे ठरतात. यामुळे गुन्हेगारीला आळा बसतो. अलिबाग शहरात सीसीटीव्ही कॅमेरे बसवले आहेत. महाड, रोहा, माणगाव, श्रीवर्धन, पेण या शहरांमध्येदेखील सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्यात येणार येतील.**

**-उदय सामंत,**
**पालकमंत्री, रायगड**

# नेरळ ग्रामपंचायत कर्मचाऱ्याची आत्महत्या

**कर्जत :** नेरळ ग्रामपंचायत कर्मचाऱ्याने गळफास घेत आत्महत्या केली. गणेश जैतु जाधव असे आत्महत्या करणाऱ्या तरुणाचे नाव असून तो नेरळ सम्राट नगर येथे राहत होता. गेले नऊ महिने ग्रामपंचायतीकडून पगार मिळाला नव्हता. त्यामुळे बँकेचे हप्ते थकल्याने नोटिसा आल्या होत्या. आर्थिक विवंचनेतून शनिवारी (दि.१०) आत्महत्या केल्याची माहिती समोर आली. येथील नागरिकांनी नेरळ पोलीस ठाण्यात माहिती देताच घटनास्थळी पोलीस दाखल झाले होते.

पान १ वरुन

## नैना क्षेत्रात युडीसीपीआर लागू करण्याबाबत शासन सकारात्मक -मंत्री उदय सामंत

नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ प्रभाव क्षेत्राकरिता नैना विशेष नियोजन प्राधिकरण सिडकोने निर्माण केले आहे. या अधिसूचित क्षेत्रात पनवेल, उरण व पेण तालुक्यातील १७५ गावांचा समावेश आहे. नैना अधिसूचित क्षेत्रामध्ये २३ गावांची अंतरिम प्रारूप विकास योजना शासनाने यापूर्वीच मंजूर केली आहे. उर्वरित १५२ गावांची प्रारूप विकास योजना १६ सप्टेंबर २०२२ रोजीच्या अधिसूचनेनुसार मंजूर झाली आहे. नैना परिक्षेत्रात युडीसीपीआर लागू झाल्यास अनेक प्रश्न मार्गी लागतील, असे मंत्री उदय सामंत यांनी या वेळी सांगितले.

बैठकीनंतर माध्यमांशी बोलताना आमदार प्रशांत ठाकूर म्हणाले की, येणाऱ्या कालावधीत नैना क्षेत्रातील प्रत्येक टीपीएस योजनेमधील गावांच्या समस्या सोडविण्यासाठी सिडको (नैना)मार्फत प्रत्येक गावनिहाय समस्या निवारण शिबिराचे आयोजन केले जावे. यामुळे नैना प्रकल्पातील सर्व गावातील शेतकऱ्यांना जाणवणाऱ्या अडचणी मांडण्यास संधी मिळेल व त्यांच्या समस्या सुटण्यास प्राधान्य मिळेल, अशी मागणी मी पालकमंत्री उदय सामंत यांच्याकडे केली. यावर पालकमंत्री उदय सामंत यांनी याच पद्धतीची कार्यवाही करण्याचे आदेश सिडकोला दिले आहेत.

दरम्यान, जासई (ता. उरण) येथील महात्मा फुले सामाजिक प्रबोधन व परिवर्तन प्रतिष्ठानच्या निवेदनाच्या अनुषंगानेही पालकमंत्री उदय सामंत यांच्या उपस्थितीत बैठक झाली. या वेळी प्रतिष्ठानचे अध्यक्ष अतुल पाटील आणि पदाधिकारी उपस्थित होते. त्यांच्या प्रश्नांवर शासन सकारात्मक विचार करेल, असे मंत्री उदय सामंत यांनी सांगितले.

# मुंबई विद्यापीठात पत्रकारिता वर्गाचे प्रवेश सुरू

**मुंबई :** मुंबई विद्यापीठाच्या गरवारे व्यवसाय शिक्षण आणि विकास संस्थेत २०२४-२५ या शैक्षणिक वर्षाची प्रवेश प्रक्रिया सुरु झाली आहे. मुद्रित, दृकश्राव्य तसेच वेब प्रसारमाध्यम क्षेत्रात वार्ताहर, उपसंपादक, संपादक, भाषांतरकार, वृत्त निवेदक, कंटेंट रायटर्स, ब्लॉग रायटर्स, जनसंपर्क अधिकारी, इव्हेंट मॅनेजर अशा नानाविध करिअरच्या संधी देणारा हा एक वर्ष कालावधीचा अर्धवेळ अभ्यासक्रम असून शनिवार, रविवार या सुट्टीच्या दिवसांत चालविला जातो.

यासाठी घेण्यात येणाऱ्या प्रवेश परीक्षेची माहिती आपल्याला ईमेलद्वारे लवकरच कळविण्यात येईल. इच्छुक विद्यार्थ्यांनी अधिक माहितीसाठी प्रा.नम्रता कडू, वर्ग समन्वयक, मराठी पोस्ट ग्रॅजुएट डिप्लोमा इन मीडिया मॅनेजमेंट (७९७७४८९०७६) अथवा namratakaduyahoo.com येथे संपर्क साधावा असे आवाहन करण्यात आले आहे.


**महाराष्ट्र शासन**

**कार्यकारी अभियंता यांचे कार्यालय, अलिबाग सा.बां. विभाग,**
**अलिबाग पिन कोड - ४०२ २०१**

ई-मेल पत्ता :- alibag.ee@mahapwd.com दुरध्वनी/फॅक्स क्रमांक :- (०२१४१) २२२०८४/२२५०९६

**ई- निविदा सूचना क्र. ५२ सन २०२३-२०२४**

कार्यकारी अभियंता, सा.बां. विभाग, अलिबाग महाराष्ट्र शासनाच्या सार्वजनिक बांधकाम खात्याकडून सक्षम कंत्राटदारांकडून (जे निविदेत असलेल्या अटी व शर्ती पूर्ण करतील त्यांचे कडून) / नोंदणीकृत कंत्राटदारांकडून ब-१ नमुन्यातील ई-निविदा प्रणालीव्दारे (ऑनलाईन) निविदा मागवित आहेत. निविदा कागदपत्र शासनाच्या संकेतस्थळावर http://mahatenders.gov.in येथून डाऊनलोड करण्यात यावी. तसेच निविदा स्विकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार कार्यकारी अभियंता, सा.बां. विभाग, अलिबाग यांनी राखून ठेवला आहे. अट असलेली निविदा स्विकारली जाणार नाही.

| अ.क्र. | कामाचे नाव | अंदाजित किंमत रुपये |
|---|---|---|
| १) | रा.म.मा. ५४८ अ ते परळी घोटवडे रस्ता इजिमा-७९ रस्त्यावर कि.मी. १/९०० येथे मोठया पुलाचे पोहचमार्गासह पुनरबांधकाम करणे ता. सुधागड जि. रायगड | रु. २,५८,०८,५७६.०० |
| २) | रायगड जिल्हयातील सुधागड तालुक्यातील डोंगरगाव आंबवणे कळंब जांभुळपाडा रस्ता रामा-११० किमी ३५/६०० ते ४०/००० रस्त्याचे मजबुतीकरण व डांबरीकरण करणे | रु. ३,३५,९२,८५४.०० |
| ३) | रायगड जिल्हयातील सुधागड तालुक्यातील उध्दर कुंभारघर महागांव चंदरगाव हातोंड गोंदाव ते रा.म.मा. ५४८अ प्रजिमा-४० किमी १०/०० ते १७/०० लांबीमध्ये रस्त्याचे मजबुतीकरण व डांबरीकरण करणे. | रु. २,६६,४९,८८९.०० |
| ४) | फल्याण वावे जांभूळपाडा नवघर ठाणाळे नाडसूर भार्जे भार्जेवाडी एरळ जामगाव रस्ता प्रजिमा ३८ किमी ०/०० ते १/५०० या लांबीमध्ये रूंदीकरण, मजबुतीकरण व डांबरीकरण करणे ता. सुधागड, जिल्हा रायगड | रु. १,५१,५९,१६५.०० |
| ५) | रायगड जिल्हयातील सुधागड तालुक्यातील प्रजिमा-४० ते दुधणी ठाकुरवाडी ताडगाव घोडगांव आदीवासीवाडी रस्त्याचे बांधकाम करणे ता. सुधागड, जि. रायगड | रु. २,०९,२४,५४२,०० |

**ई-निविदा उपलब्ध कालावधी** :- दिनांक १२.०२.२०२४ (स.१०.००) ते दिनांक २६.०२.२०२४ (सं.१८.००)

**निविदापुर्व बैठक :** :- मा. मुख्य अभियंता, सा.बां. प्रादेशिक विभाग, कोकण मर्झबान रोड, मुंबई यांचे दालनात दि. २०.०२.२०२४ रोजी दु. ३.०० वाजता (अ.क्र.१ ते३)

: - अधीक्षक अभियंता, रायगड (सा.बां.) मंडळ, कोकणभवन, नवी मुंबई यांचे दालनात दि. २३.०२.२०२४ रोजी दु. ३.०० वाजता (अ.क्र.४ ते ५)

**ई-निविदा उघडणे** :- दिनांक २८.०२.२०२४ (दु.३.०० वा.) (अधीक्षक अभियंता, रायगड (सा.बां.) मंडळ, कोकणभवन, नवी मुंबई)

खालील संकेतस्थळावर ई-निविदाची सर्व माहिती उपलब्ध आहे.
१. http://mahapwd.com २. http://mahatenders.gov.in
(सदर निविदेसूचनेमध्ये काही बदल होत असल्यास वरील वेबसाईटवरती कळविण्यात येईल.)
३. कार्यकारी अभियंता, सा.बां. विभाग, अलिबाग कार्यालयातील सूचना फलक.

**जा.क्र./ सा.बां./अवि/निविदा/ ६८५/२०२४**
**कार्यकारी अभियंता यांचे कार्यालय,**
**सा.बां. विभाग, अलिबाग-४०२ २०१**
**दिनांक :- ०६/०२/२०२४**

**सही/-**
**(ज.ई. सुखदेवे)**
कार्यकारी अभियंता, सा.बां. विभाग,
अलिबाग, जि.रायगड



**महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ**

(महाराष्ट्र शासन अंगिकृत)

**मुदतवाढ सूचना**

**ई निविदा सूचना क्र. १३०/२०२३-२०२४ (मुंबई) करीता**

दिनांक ३१/०१/२०२४ रोजी दैनिक नवाकाळ, मुंबई, दैनिक मिड डे , मुंबई, दैनिक फ्रिप्रेस जरनल, मुंबई, दैनिक प्रातःकाल,मुंबई, दैनिक नवभारत, मुंबई, दैनिक रामप्रहर, मुंबई या वृत्तपत्रामध्ये प्रसिद्ध झालेल्या वरील ई निविदा सूचनेतील खालील कामाकरीता कंत्राटदारांचे प्रश्न, कंत्राटदारांच्या मुद्यांचे निराकरण / महामंडळाचा खुलास महामंडळाच्या संकेतस्थळावर उपलब्धतेबाबत तसेच सुधारित अंदाजित रकमेबाबत मुदतवाढ सूचना देण्यात येत आहे.

| अ. क्र. | कामाचे नांव | अंदाजित रक्कम रुपये दिनांक ३१/०१/२०२४ रोजी प्रसिद्ध झालेली | अंदाजित रक्कम रुपये अशी वाचावी |
|---|---|---|---|
| १. | विळे भागड औद्योगिक क्षेत्र.. विळेभागड औद्योगिक क्षेत्र पाणीपुरवठा योजनेच्या जलशुद्धीकरण केंद्रामधून जिल्हा रायगड, तालुका माणगाव मधील कडपे, कडपेवाडी, कांदळगाव, बांदलवाडी, निजामपूर, कोष्टे (ख) या गावांना पाणीपुरवठा करण्याकरीता मृदु पोलादी जलवाहिनीचा पुरवठा करणे. | ₹२८,०७,२३,४७८.०० | ₹२८,०९,११,४३८.०० |

इच्छुकांनी सदर कामाबाबत दिनांक १५/०२/२०२४ पूर्वी त्यांचे प्रश्न महामंडळाच्या संकेत स्थळावर नोंदवावेत. कंत्राटदारांच्या मुद्यांचे निराकरण /महामंडळाचा खुलासा दिनांक २०/०२/२०२४ पासून महामंडळाच्या संकेत स्थळावर उपलब्ध होईल.

ज्या निविदा धारकांनी यापूर्वी आपली निविदा भरली असेल अथवा अपलोड केली असेल, त्यांनी निविदेमध्ये बदल करुन किंवा बदल न करता सदर निविदा पुन्हा भरणे आवश्यक आहे, याची कृपया नोंद घ्यावी, अशा कंत्राटदारांनी शुद्धिपत्रकानंतर जर निविदा पुन्हा भरली नाही अथवा अपलोड केली नाही तर त्यांचा देकार सदर स्पर्धात्मक निविदेतून आपोआप बाद होईल.

सदर निविदा सूचनेत इतक कोणताही बदल करण्यात आलेला नाही.



**महाराष्ट्र शासन**

**महाड सार्वजनिक बांधकाम विभाग, महाड (रायगड)**

**Email :- mahad.ee@mahapwd.gov.in Ph. No. (02145) 222167**

**निविदा सूचना क्रमांक १५५ सन २०२३-२०२४**

कार्यकारी अभियंता, महाड (सा.बां.) विभाग, महाड, जिल्हा रायगड, पिन-४०२३०१, दूरध्वनी क्रमांक ०२१४५-२२२१६७ महाराष्ट्र शासनाच्या सार्वजनिक बांधकाम खात्याकडे योग्य त्या वर्गातील नोंदणीकृत कंत्राटदार यांचेकडून खालीलप्रमाणे बी-१ नमुन्यातील निविदा ई-निविदा प्रणालीद्वारे (ऑनलाईन) निविदा मागवित आहेत. निविदा कागदपत्रे शासनाच्या https://mahatenders.gov.in या संकेतस्थळावरून डाऊनलोड करण्यात यावी. तसेच निविदा स्विकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार कार्यकारी अभियंता, महाड (सा.बां.) विभाग, महाड, जिल्हा रायगड यांनी राखून ठेवला आहे.

| अनु. क्रमांक | कामाचे नांव | कामाची अंदाजित किंमत | इसारा / बयाणा रक्कम | ई-निविदा संचाची किंमत | काम पूर्ण करण्याचा कालावधी (पावसाळा धरून) | नोंदणी वर्ग |
|---|---|---|---|---|---|---|
| १. | पोलादपूर येथे शासकीय विश्रामगृहाचे बांधकाम करणे ता. पोलादपूर, जि. रायगड | १,८६,७८,५०७/- | १,५०,०००/- | १,१८०/- | १२ महिने | अवश्यकता नाही |

**ई निविदेचे वेळापत्रक**

| | | |
|---|---|---|
| १ | निविदासंच डाऊनलोड व ऑनलाईन निविदा सादर करण्याचा दिनांक व वेळ | दिनांक **०९/०२/२०२४** (सकाळी १०.०० पासून) ते दिनांक **२३/०२/२०२४** वेळ १८.०० वाजेपर्यंत. |
| २ | **निविदा पुर्व बैठक** | अधीक्षक अभियंता, (सा.बां.) मंडळ , कोकण भवन नवी मुंबई यांचे कार्यालयात **दिनांक १५/०२/२०२४ वेळ १२.०० वाजता** |
| ३ | ऑनलाईनद्वारे तांत्रिक व आर्थिक देकार उघडण्याचा दिनांक व ठिकाण (शक्य असल्यास) | अधीक्षक अभियंता, (सा.बां.) मंडळ , कोकण भवन नवी मुंबई यांचे कार्यालयात दिनांक **२६/०२/२०२४ वेळ ११.०० वाजता** |

**टिप :-** परिपूर्ण निविदा https://mahatenders.gov.in या संकेतस्थळांवर पाहता किंवा विकत घेता येतील व ऑनलाईन निविदा सादर करता येतील. सदर निविदांचे सविस्तर वेळापत्रक, शुद्धिपत्रके तसेच इतर काही दुरूस्त्या, शर्ती व अटी या वरील संकेतस्थळांवरच पाहता येतील.

**जा.क्र.मवि/लेशा/निविदा/७६६**
**दिनांक : १३/०२/२०२४**

**सही/**
**कार्यकारी अभियंता**
**महाड (सा.बां.) विभाग, महाड**

# तळोजात लवकरच होणार आरोग्यवर्धिनी केंद्र

## पनवेल महापालिकेचा नागरिकांना दिलासा

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

तळोजा वसाहतीमध्ये एकही आरोग्यवर्धिनी केंद्र नाही. त्यामुळे रहिवाशांना खासगी दवाखान्यांवर अवलंबून राहावे लागते. पालिका प्रशासनाने सिडको मंडळाकडून तळोजा फेज २ येथील केदार सोसायटीमध्ये खरेदी केलेल्या गाळ्यांमध्ये पुढील १५ दिवसांत आरोग्यवर्धिनी केंद्र सुरू होणार असल्याची माहिती महापालिकेचे वैद्याकीय आरोग्य अधिकाऱ्यांनी दिली. त्यामुळे पंधरवड्यापासून तळोजावासीयांना हक्काचा दवाखाना मिळणार आहे.



२० हजार लोकवस्ती असलेल्या परिसरात एक आरोग्यवर्धिनी केंद्र आणि ५० हजारांहून अधिक लोकवस्तीसाठी एक आपला दवाखाना पनवेल पालिकेने सुरू केला आहे, परंतु तळोजा परिसराची लोकसंख्या ७५ हजारांहून अधिक असली तरी येथे अद्याप आरोग्याची सुविधा पालिकेने सुरू केली नव्हती.

सिडको मंडळाकडून गाळे मिळण्यास लागलेला विलंब यास कारणीभूत असल्याचे सांगितले जात होते, मात्र तळोजा वसाहतीमधील फेज २मध्ये सेक्टर २१ येथे केदार सोसायटीमध्ये सिडको मंडळाकडून गाळे खरेदी केल्यानंतर पालिकेने हस्तांतरण प्रक्रिया पूर्ण झाल्याची माहिती दिली.

**पुढील १५ ते २० दिवसांत तळोजामध्ये आरोग्यवर्धिनी केंद्र सुरू होईल. गाळे पालिकेच्या ताब्यात मिळाले असून आरोग्यवर्धिनी केंद्राच्या अंतर्गत कामाची प्रक्रिया सुरू आहे. प्रत्यक्षात काम पूर्ण झाल्यावर तातडीने आरोग्य सेवा दिल्या जातील.**

**–डॉ. आनंद गोसावी, वैद्याकीय आरोग्य अधिकारी, पनवेल पालिका**

## बांधकामाच्या ठिकाणावरून वायरची चोरी

**पनवेल : वार्ताहर**

पनवेलजवळील करंजाडे से. ६ येथे एल अँड टी कंपनीतर्फे डब्ल्यूडीएफसी कॉरिडॉर प्रोजेक्टचे काम सुरू असलेल्या ठिकाणावरून अज्ञात चोरट्यांनी कॉपर कंट्रोल वायरची चोरी केल्याची घटना घडली आहे.

या ठिकाणावरून १३०० मीटर कॉपर कंट्रोल वायर ज्याची किमंत जवळपास १५ हजार इतकी आहे, ती अज्ञात चोरट्यांनी चोरून नेल्याने या प्रकरणी तक्रार पनवेल शहर पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे.

# बेकायदेशीर वास्तव्य करणाऱ्या चार बांगलादेशींना अटक

**पनवेल : वार्ताहर**

अनधिकृतपणे भारतात प्रवेश करून तालुक्यातील विविध परिसरात वास्तव्य करणाऱ्या चार बांगलादेशींना पनवेल शहर पोलिसांनी ताब्यात घेतले असून त्यांच्याविरुद्ध पासपोर्ट अधिनियम १९६७चे कलम ३(अ), १२(क) सह विदेशी व्यक्ती अधिनियम १९४६चे कलम १४ (अ) अन्वये कारवाई सुरू केली आहे.

पनवेल शहर पोलिसांनी बेकायदेशीररित्या वास्तव्य करणाऱ्या परकीय नागरिकांविरोधात कारवाई सुरू केली असून वरिष्ठ पोलीस निरीक्षक नितीन ठाकरे यांच्या मार्गदर्शनाखाली निरीक्षक प्रवीण भगत, उपनिरीक्षक अभयसिंह शिंदे, गोविंद दाभाडे, हवालदार नितीन वाघमारे, परेश म्हात्रे, पोना. रविंद्र पारधी, विनोद देशमुख, शिपाई प्रसाद घरत, नितीन कांबळे, साईनाथ मोकळ या पथकाने पनवेल परिसरात झाडाझडती घेतली. मूळ बांगलादेशात वास्तव्यास असलेले आणि पनवेल तालुक्यातील विविध परिसरात राहणारे आरोपी सामीऊल बिरु काझी (वय २४, सध्या रा. भारतनगर खाडीजवळील झोपडी), मुबारक हाशिमअली गाजी (वय ५७, सध्या रा. कच्छि मोहल्ला मधील झोपडी), इक्राम बादशाह शेख (वय २४) आणि रसल बाबुल शेख (वय २४) हे पळस्पे परिसरातून संशयितरित्या फिरत असताना सापडले.

त्यांना ताब्यात घेऊन अधिक चौकशी केली असता ते कोणत्याही वैध प्रवासी कागदपत्राविना भारत-बांगलादेश सीमेवरील मुलकी अधिकाऱ्याच्या लेखी परवानगीशिवाय अवैध मार्गाने भारतात प्रवेश करून आले असल्याचे आढळून आहे. त्यानुसार पनवेल शहर पोलिसांनी या चौघांविरोधात पासपोर्ट अधिनियम १९६७ चे कलम ३(अ), १२(क)सह विदेशी व्यक्ती अधिनियम १९४६चे कलम १४ (अ) अन्वये कारवाई सुरू केली आहे.



पनवेल : जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे सचिव डॉ. सिद्धेश्वर गडदे यांना वाढदिवसानिमित्त सोमवारी संस्थेचे चेअरमन माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी पुष्पगुच्छ देऊन शुभेच्छा दिल्या. इतर उपस्थित मान्यवरांनीही त्यांना शुभेच्छा दिल्या.

## पॉलिकॅब कंपनीच्या वायरची चोरी

**पनवेल :** नवीन घराचे बांधकाम चालू असलेल्या ठिकाणावरून पॉलिकॅब कंपनीच्या वायरची चोरी झाल्याची घटना काळुंद्रे गावात घडली. सागर पाटील यांच्या घराचे बांधकाम चालू असताना जवळपास ३७ हजार ८०० रुपये किमतीच्या पॉलिकॅब कंपनीच्या वायरची चोरी अज्ञात चोरट्याने केल्याने याबाबतची तक्रार पनवेल शहर पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे.

# पनवेल महापालिकेतर्फे पर्यावरण सेवा योजनेंतर्गत पोस्टर मेकिंग स्पर्धा, व्याख्यान

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

माझी वसुंधरा अभियान ४.०अंतर्गत पर्यावरण संवर्धन व संरक्षणाचे महत्त्व पटवून देण्यासाठी माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळांमध्ये पर्यावरण सेवा योजना पनवेल महापालिकेच्या वतीने राबविण्यात येत आहे. या अंतर्गत आयुक्त गणेश देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली सोमवारी (दि. १२) न्यू हॉरिझन पब्लिक स्कूल पनवेल येथे पर्यावरणविषयक पोस्टर मेकिंग स्पर्धा व व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले.




### पोस्टर मेकिंग स्पर्धेतील विजेते

1. **कनिष्का विलास बामबार्डेकर (इ. आठवी)**
2. **ओम सुनिल गलवे (इ. सातवी)**
3. **अंतरा गौरव अंधेरे (इ. आठवी)**
4. **वंशिका अनिलकुमार धार (इ. सातवी)**

पर्यावरण सेवा योजनेंतर्गत न्यू हॉरिझन पब्लिक विद्यालयामध्ये या योजनेची माहिती विद्यार्थ्यांना देण्यात आली. यामध्ये विद्यार्थ्यांनी झाडे दत्तक घेऊन त्यांना वाढविण्याविषयी सांगण्यात आले, तसेच पर्यावरणाचे महत्त्व या विषयावर व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते. माझी वसुंधरा अंतर्गत ऊर्जा विषयाशी संबंधित इ. सहावी, सातवी, आठवी यांची पोस्टर मेकिंग स्पर्धा घेण्यात आली. याबरोबरच पर्यावरण संवर्धनावर आधारित व्हिडीओ विद्यार्थ्यांना दाखविण्यात आले.

या वेळी विद्यालयाचे संचालक स्वाती शिराळकर, प्राचार्या अमिता दत्ता, उपप्राचार्या पुष्पा मेनन, पर्यावरण सेवा योजना कार्यक्रम समन्वयक मेघा मानकर, विद्यार्थी उपस्थित होते.

# गृहनिर्माण संस्थांचे अभिहस्तांतरण करण्याससंदर्भात चर्चासत्र

**पनवेल : वार्ताहर**

सिडकोनिर्मित नवी मुंबई व पनवेल क्षेत्रातील मावेजा रकमेची वसुली प्रलंबित असलेल्या इमारतींना भोगवटा प्रमाणपत्र, भाडेपट्टा खत, अभिहस्तांतरण करण्याबाबत एकता सामाजिक संस्थेच्या माध्यमातून राज्य सरकारकडे पाठपुरावा सुरू होता. त्यास यश येऊन राज्य सरकारने सिडकोतर्फे अशा इमारतींसाठी नवी अभय योजना जाहीर करण्यात आली आहे.



जास्तीत-जास्त नागरिकांनी, विकासकांनी आणि गृहनिर्माण संस्थांनी या योजनेचा लाभ घेण्याच्या दृष्टीने एकता सामाजिक संस्थेच्या वतीने स्वस्तिक प्लाझा, सेक्टर ११ कामोठे येथे जनजागृतीपर चर्चासत्रात आयोजित करण्यात आले होते. यात गृहनिर्माण संस्थांच्या अनेक प्रश्नांना पनवेल सिडको हौसिंग फेडरेशनचे अध्यक्ष कुंडलिक काटकर, तसेच याविषयातील जाणकार मुकूंद शितोळे, काशिनाथ जाधव यांनी मार्गदर्शन केले.

कामोठेमधील ७०पेक्षा जास्त तसेच करंजाडेमधील काही गृहनिर्माण संस्थांनी यात सहभाग नोंदवला. एकता सामाजिक संस्थेने शासनाकडे यशस्वी पाठपुरावा केल्याबद्दल सर्वांनी संस्थेचे अध्यक्ष अमोल शितोळे यांचे आभार मानले. या वेळी सामाजिक कार्यकर्ते अल्पेश माने, गौरव पोरवाल, बाळासाहेब सकपाळ, अजिनाथ सावंत आदि उपस्थित होते. या चर्चासत्रासाठी कामोठेमधील स्वस्तिक प्लाझा गृहनिर्माण संस्थेचे खजिनदार हिरा भट्ट आणि सर्व पदाधिकाऱ्यांनी मोलाचे सहकार्य केले.

**जोपर्यंत कामोठेमधील सर्व इमारतींचे अभिहस्तांतरण होत नाही तोपर्यंत एकता सामाजिक संस्थेमार्फत रहिवाशांना मार्गदर्शन केले जाईल. सिडको क्षेत्रात घरे घेताना बिल्डरने फसवणूक केल्याने रहिवाशांना नाहक भुर्दंड सोसावा लागतो याबद्दल लवकरच सिडको आणि शासनाकडे पुन्हा नव्याने पाठपुरावा करू.**

**–अमोल शितोळे**



पनवेल : तालुक्यातील करंबेळी येथील भाजपचे कार्यकर्ते चांगू चौधरी यांची कन्या चि.सौ.कां. भारती आणि चि.सौ.कां. रिना यांच्या शुभविवाहानिमित्त भाजप नेते एकनाथ देशकर यांनी शुभेच्छा दिल्या. सोबत रवींद्र पाटील, बापू चौधरी, चांगू चौधरी आदी उपस्थित होते.

# माघी गणेशोत्सवानिमित्त चिरनेरच्या महागणपती मंदिरात उत्साहाचे वातावरण

**उरण : प्रतिनिधी**

चिरनेर येथील गणपतीच्या मंदिराची निर्मिती पेशवे बाळाजी बाजीराव उर्फ नानासाहेब पेशवे यांच्या कारकिर्दीत झाली. माघ शु.४, विनायक चतुर्थी (अंगारक योग) मंगळवारी (दि.१३) महागणपती मंदिरात गणेश जयंती उत्सव साजरा होत आहे. चिरनेर गाव परिसर सजलेला पहायला मिळत आहे. विविध ठिकाणचे भक्तगण या गणेश जयंतीनिमित्त चिरनेर मुक्कामी श्रींचे दर्शन घेण्यासाठी नित्यनेमाने दाखल होत आहेत.

नवसाला पावणारे आणि भक्तांच्या हाकेला धावणारे दैवत म्हणून या चिरनेर महागणपतीची प्रचिती साऱ्यांनाच ठाऊक आहे. वर्षभरात सहा महिन्यांनी एकदा येणारी संकष्टी चतुर्थी मागील २०२३ वर्षी एकदाच आली होती, तर यंदाच्या यंदाची गणेश जयंती मंगळवारी अंगारक योग म्हणून आल्याने भक्तगणांच्या गर्दीचा उच्चांक पहावयास मिळणार आहे.



त्यामुळे गणपती देवस्थाच्या विश्वस्त मंडळाने भक्तांसाठी सर्व व्यवस्था सज्ज ठेवली आहे.

नोव्हेंबर १७५८ ते फेब्रुवारी १७५९मध्ये नानासाहेब पेशवे स्वतः कोकणात फिरलेले दिसून येतात. वसईच्या विजयानंतर कोकणातील उरण व कर्नाळा प्रांताचा कारभार नानासाहेबांचे सुभेदार रामजी पंत फडके यांनी चालविला. हा कारभार करताना त्यांनी अनेक ठिकाणी देऊळे बांधली, तसेच देऊळांचा जीर्णोद्धार केला. चिरनेर येथील गणपती मंदिर हे हेमाडपंथीय धाटणीचे दिसून येते. देवगिरीच्या रामदेवरावांचे हेमाडपंत हे प्रधान होते. त्यांनी विशिष्ट प्रकारची देऊळे बांधण्याचे स्थापत्य प्रगत केले. देऊळ बांधताना चुना, मातीचा वापर न करता दगडी चिऱ्यांचा उपयोग करून देवळाची निर्मिती केलेली आहे. या पद्धतीला हेमाडपंथीय धाटणीचे मंदिर हे नाव रूढ झाले.

चिरनेर येथील महागणपतीचे तीर्थस्थान हे पेशवेकालीन असल्याचा दाखला मिळत असला, तरी महागणपतीचे मंदिर हे पेशवे काळात बांधले आहे. महागणपतीची मूर्ती अत्यंत पुरातन असल्याचे दिसून येते. देऊळाच्या निर्मितीने मूळगाव वसले. चिरनेर मंदिराचे पुजारी आगरी समाजाचे आहेत. पूर्वी गणपतीला कौल लावायचे, याचा निर्णय गणपती देत असे. माघ उत्सवातील चतुर्थीला येथे श्री गजानन प्रत्यक्ष भोजनास येतात. अशी श्रद्धा असल्याने, या दिवशी भक्तांची गर्दी असते. या दिवशी श्रींना महानैवद्य आणि सर्व गणेश भक्तांना महाप्रसादाचा लाभ दिला जातो.

## बंद फार्महाऊसवर चोरी करण्याचा प्रयत्न असफल

**पनवेल : वार्ताहर**

उसर्ली-शिवकर गावातील एका फार्महाऊसवर काही अज्ञात चोरट्यांनी चोरी करण्याचा प्रयत्न केला होता. हा सर्व प्रकार सीसीटीव्ही कॉमेरामध्ये कैद झाला आहे. या संदर्भात सर्वांनी सतर्क राहण्याच्या सूचना पनवेल शहर पोलिसांनी दिल्या आहेत.

पनवेल शहर पोलीस ठाणे हद्दीतील उसर्ली-शिवकर गावातील राकेश जैन यांच्या फार्महाऊसवर काही अज्ञात चोरांनी चोरी करण्याचा प्रयत्न केला. हा सर्व प्रकार सीसीटीव्ही कॉमेरामध्ये कैद झाला आहे. त्यामुळे एकांतात असणारे बंगले, फार्म हाऊसवरील सुरक्षा रक्षक आणि ग्रामस्थांनी सतर्क राहण्याच्या सूचना पनवेल शहर पोलिसांनी दिल्या आहेत, तसेच नागरिकांच्या सुरक्षेसाठी पोलिसांकडून गस्त घालण्यात येणार असून नाकाबंदीदेखील करण्यात आल्याची माहिती पोलिसांनी दिल्या आहेत.



# रामशेठ ठाकूर महाविद्यालयात टायपो टेस्ट, वेबपेज डिझायनिंग स्पर्धा

**खारघर : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे खारघर येथील रामशेठ ठाकूर वाणिज्य व शास्त्र महाविद्यालयात सोमवारी (दि.१२) स्व. जनार्दन भगतसाहेब यांच्या जयंतीच्या पार्श्वभूमीवर माहिती व तंत्रज्ञान तसेच कॉम्प्युटर सायन्स विभागातर्फे आंतरमहाविद्यालयीन वेबपेज डिझायनिंग व टायपो टेस्ट या दोन स्पर्धांचे आयोजन केले होते.

या स्पर्धेमध्ये नवी मुंबईमधील वेगवेगळ्या महाविद्यालयांनी सहभाग घेतला होता. त्यामध्ये विद्यालंकार महाविद्यालय, वडाळा, चांगू काना ठाकूर महाविद्यालय न्यू पनवेल, विकास महाविद्यालय विक्रोळी मुंबई यांचा प्रामुख्याने समावेश होता.

वेबपेज डिझायनिंग स्पर्धेसाठी स्व. जनादन भगतसाहेब यांचे जीवन व कार्य हा विषय देण्यात आला होता. त्या अनुषंगाने सर्व स्पर्धकांनी त्यांच्या कलागुणांचे सादरीकरण केले, तसेच टायपो टेस्ट स्पर्धेच्या माध्यमातून स्पर्धकांनी त्यांचे अचूक टायपिंग स्पीड दाखवण्याचा प्रयत्न केला. या दोन्हीही स्पर्धेमध्ये सुमारे ६० विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त असा सहभाग घेतला.

महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. रूपेंद्र गायकवाड यांनी, या दोन्ही स्पर्धेसाठी विद्यार्थ्यांना प्रोत्साहन दिले व त्यांच्या हस्ते विजेत्यांना पारितोषिके देण्यात आली.

या दोन्हीही स्पर्धांचे आयोजन प्रा. स्नेहा लोखंडे विभागप्रमुख माहिती व तंत्रज्ञान व कॉम्प्युटर सायन्स यांनी केली तसेच प्रा. डॉ. महेश्वरी झिरपे समन्वय अंतर्गत गुणवत्ता सिद्धता कक्ष, प्रा. महेश धायगुडे, प्रा. राजश्री म्हात्रे, प्रा. राणी शेख, प्रा. रिजवाना मोमीन, प्रा. शाहीन मुल्ला, प्रा. श्रद्धा करवा, प्रा. नीलम मोरे व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी सहकार्य केले.



## संपादकीय

# उतरती कळा

गेली ४०हून अधिक वर्षे काँग्रेसशी एकनिष्ठ राहिलेले माजी मुख्यमंत्री आणि ज्येष्ठ नेते अशोक चव्हाण यांनी काँग्रेसचा 'हात' अखेर सोडला. गेले काही महिने त्यांच्या डोक्यात असा काही विचार घोळत असल्याची चर्चा होतच होती. एखाद्या ज्येष्ठ नेत्याने आपला पक्ष सोडून भारतीय जनता पक्षाची वाट धरली की लागलीच ईडी आणि सीबीआयच्या धाकाची भाषा विरोधी पक्ष करू लागतात. या राजकीय कोल्हेकुईला हल्ली कुणी फारशी किंमत देत नाही हा भाग निराळा.

**शतकभराहून अधिक काळाचा इतिहास असलेल्या काँग्रेस पक्षाला २०१४पासून जी उतरती कळा लागली आहे, ती पाहून बुजुर्ग नागरिकांना काहीसे वाईटही वाटत असेल. स्वातंत्र्य चळवळीत भरीव योगदान देणाऱ्या या पक्षाने देशाला अनेक दशके नेतृत्व दिले, परंतु भ्रष्टाचार, स्वार्थी राजकारण आणि एकाच परिवाराभोवती गोंडा घोळण्याच्या प्रवृत्तीमुळे काँग्रेसचे पुरते वाटोळे झाले आहे. आजवर अनेक फटके बसूनही हा पक्ष त्यातून कुठलाही धडा शिकताना मात्र दिसत नाही. देश पातळीवर या पक्षाचे जे धिंडवडे निघाले तसेच आता महाराष्ट्रातदेखील निघू लागले आहेत. अशोक चव्हाण यांनी सोमवारी सकाळी विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर यांच्याकडे आमदारकीचा राजीनाम सोपवला. त्याआधी त्यांनी काँग्रेस पक्षाच्या प्राथमिक सदस्यत्वाचा राजीनामा पक्षश्रेष्ठींकडे पाठवला होता. त्यानंतर चव्हाण यांच्या संदर्भातील बातम्या समाजमाध्यमे आणि वृत्तवाहिन्यांवर दिवसभर वाजू लागल्या. चव्हाण यांच्यासमवेत काँग्रेसचे आणखी डझनभर आमदार राजीनामे देणार असल्याचे बोलले जात आहे. त्यात कितपत तथ्य आहे हे येत्या एक-दोन दिवसांत स्पष्ट होईल. ४० वर्षे काँग्रेससोबत निष्ठेने समाजसेवा केल्यानंतर आता नवा पर्याय शोधण्याची वेळ आली आहे. मी कोणावरही नाराज नाही आणि मला पक्षातील कोणाचीही उणीदुणी काढायची नाहीत असे स्पष्ट करतानाच अशोक चव्हाण यांनी 'पुढे काय करणार' या प्रश्नाचे उत्तर गुलदस्त्यातच ठेवले आहे. चव्हाण एक-दोन दिवसात भारतीय जनता पक्षात प्रवेश करतील अशी चिन्हे आहेत. भाजपचे राज्यातील लोकप्रिय व मुरब्बी नेते देवेंद्र फडणवीस यांनी 'आगे आगे देखो होता है क्या' अशा सूचक शब्दांत काँग्रेसमधील संभाव्य भूकंपाचे सुतोवाच केले. चव्हाण यांच्या राजीनाम्यामुळे महाविकास आघाडी नावाच्या तथाकथित कडबोळ्याला अखेर सुरूंग लागला आहे असेच म्हणावे लागेल. कारण या आघाडीतील तिन्ही पक्ष आता उरलेसुरले नेते-कार्यकर्ते घेऊनच निवडणुकीच्या मैदानात उतरतील. खरे सांगायचे तर महाविकास आघाडीतील तिन्ही पक्षांमध्ये भारतीय जनता पक्षाला तोंड देण्याजोगी शक्तीच उरलेली नाही. केंद्रात 'इंडिया आघाडी'चे जे काही झाले त्याहीपेक्षा दैन्यावस्था महाविकास आघाडीच्या वाट्याला आली आहे. अशोक चव्हाण हे काँग्रेसमधील एक मातब्बर नेते होते. राज्यातील राजकारणात प्रचंड उलथापालथ होत असतानादेखील चव्हाण यांनी पक्षासोबतच राहणे पसंत केले होते. आता मात्र ते भाजपच्या परिवारात सहभागी झाल्यास एनडीएचे बळ लक्षणीयरित्या वाढेल यात शंका नाही. महाविकास आघाडीला आगामी निवडणुकीत पुरेसे उमेदवारदेखील सापडतील का नाही अशी शंका येत असतानाच सत्ताधारी महायुती मात्र प्रबळ होत चालली आहे ही या राजकीय नाट्याची सकारात्मक बाजू मानायला हवी. चव्हाण यांचा भाजपप्रवेश नेमका कधी होणार हे अद्याप स्पष्ट नाही, परंतु त्यांच्यापाठोपाठ एक मोठी रांग भाजपच्या दिशेने लागेल हे मात्र खरे.**

# मुख्यमंत्री वयोश्री योजना..!



ज्येष्ठ नागरिक हा समाजाचा एक महत्त्वपूर्ण घटक आहे. वृद्धांची मुख्य चिंता आरोग्य, पालनपोषण आणि आधार. पूर्वी ज्येष्ठांना घरात मान होता. काळ बदलला आजच्या ज्येष्ठ नागरिकांनी, नोकरी करून निगुतीने संसारात मिळते-जुळते घेऊन आधीच्या पिढीला सांभाळले. ग्रामीण भागात सर्व शेतीवर किंवा मजुरीवर अवलंबून असल्याने त्यांच्या हातात काही नाही. आजच्या पिढीत व्यावहारिकता वाढल्याने ज्येष्ठ नागरिक खूप दुर्लक्षित असून त्यांचे दिवस कठीण आहेत. ज्येष्ठ नागरिकांना समाजात योग्य तो सन्मान मिळावा, त्यांचे राहणीमान सुसह्य व्हावे, आरोग्याच्या सोयी-सुविधा उपलब्ध व्हाव्यात व त्यांना त्यांच्या अधिकारांची जाणीव व्हावी यासाठी सर्वच स्तरावर प्रयत्न सुरू आहेत. ज्येष्ठ नागरिकांच्या आर्थिक उन्नतीसाठी, ताणतणावातून मुक्त उत्तम आरोग्यासाठी, सामाजिक सन्मान मिळण्यासाठी महाराष्ट्रात सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागामार्फत विविध योजना राबविल्या जातात. या विभागामार्फत ९ जुलै २०१८च्या शासन निर्णयानुसार ज्येष्ठ नागरिक धोरण जाहीर करण्यात आले होते.

शासनाने एका नवीन अभिनव अशा योजनेला राज्यात मान्यता दिली आहे. या योजनेचे नाव आहे मुख्यमंत्री वयोश्री योजना. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या नेतृत्वात मुख्यमंत्री वयोश्री योजनेची अंमलबजावणी संपूर्ण राज्यात प्रभावीपणे सुरू झाली आहे. राज्यातील ६५ वर्षे व त्यावरील ज्येष्ठ नागरिकांसाठी मुख्यमंत्री वयोश्री योजना सुरू करण्यात आली आहे. ज्येष्ठांमध्ये वयोमानपरत्वे येणारे अपंगत्व, अशक्तपणा निराकरणासाठी आवश्यक उपकरणे खरेदी करणे उदा. चष्मा, श्रवणयंत्र, ट्रायपॉड, स्टिक व्हील चेअर, फोल्डिंग वॉकर, कमोड खुर्ची, नि-ब्रेस, लंबर बेल्ट, सर्वाइकल कॉलर इत्यादी. पात्र लाभार्थींना तीन हजार रुपये एकरकमी थेट लाभ त्यांच्या बँक खात्यात जमा करण्यात येणार आहेत तसेच मानसिक स्वास्थ्य संतुलित ठेवण्यासाठी मन:स्वास्थ्य केंद्र, योगोपचार केंद्र, मनशक्ती केंद्र प्रबोधन येथे सहभागी होता येणार आहे. याबाबतचा शासन निर्णय ६ फेब्रुवारी २०२४ रोजी सामाजिक न्याय विभागाने निर्गमित केला आहे.

या योजनेसाठी लाभार्थ्यांची निवड करणे, लाभार्थ्यांकडून आवश्यक कागदपत्रांची तपासणी करणे, लाभार्थ्यांचे आधार क्रमांक, बँक खाते यांची माहिती गोळा करणे इ. कामे नोडल एजन्सी/केंद्रीय सामाजिक उपक्रम संस्था यांच्या माध्यमातून आयुक्त, समाजकल्याण, पुणे यांच्याद्वारे करण्यात येईल. या योजनेंतर्गत लाभार्थ्यांची निवड, योजनेची अंमलबजावणी आणि देखरेख करण्याच्या उद्देशाने ग्रामीण भागाकरीता जिल्हाधिकारी व शहरी भागाकरिता आयुक्त, महानगरपालिका यांच्या अध्यक्षतेखाली समिती गठीत करण्यात येणार आहे.

मुख्यमंत्री वयोश्री योजनेचे फायदे हे राज्यातील ज्येष्ठ नागरिकांना मोठ्या प्रमाणावर होणार आहेत. या योजनेद्वारे ज्येष्ठ नागरिकांना आर्थिक मदतीबरोबरच इतर बरेच फायदे मिळणार आहेत. मुख्यमंत्री वयोश्री योजनेद्वारे सहभागी ज्येष्ठ नागरिकांना तीन हजार रुपये डीबीटीद्वारे थेट बँक खात्यात मिळणार आहेत. आर्थिक मदतीबरोबरच वृद्ध लोकांसाठी वेगवेगळे उपकरणेदेखील दिली जाणार आहेत. जर ज्येष्ठ व्यक्ती अपंग असेल किंवा वयोमान अशक्त असेल, तर या उपकरणांचा जेष्ठ नागरिकांना त्यांच्या दैनंदिन जीवनात फायदा होणार आहे.

मुख्यमंत्री वयोश्री योजनेमध्ये सहभागी होण्यासाठी शासनाने वेगवेगळे पात्रता निकष ठरवले आहेत त्यानुसार अर्जदार हा महाराष्ट्र राज्याचा कायमस्वरूपी रहिवासी असावा. लाभार्थी व्यक्ती ज्येष्ठ नागरिक (ज्या नागरिकांनी ३१ डिसेंबर २०२३पर्यंत वयाची ६५ वर्षे पूर्ण केली असतील) असे नागरिक पात्र समजण्यात येतील. ६५ वर्षे आणि त्याहून अधिक वय असणाऱ्या व्यक्तीकडे आधारकार्ड असणे आवश्यक आहे किंवा आधारकार्डसाठी अर्ज केला असावा. ज्या लाभार्थीकडे आधारकार्ड नसेल त्यांनी स्वतंत्र ओळख दस्ताऐवज ओळख पटविण्यासाठी दाखवावे. ज्येष्ठ नागरिकाचे वार्षिक उत्पन्न हे दोन लाखांपेक्षा कमी असावे.लाभार्थ्याने मागील तीन वर्षात स्थानिक स्वराज्य संस्था आणि सरकारद्वारे नियंत्रित सार्वजनिक उपक्रमांसहित कोणत्याही सरकारी स्त्रोतांकडून तेच उपकरण विनामूल्य प्राप्त केलेले नसावे. याबाबतचे स्वयंघोषणापत्र सादर करणे आवश्यक आहे. पात्र लाभार्थ्यांच्या बँकेच्या वैयक्तिक आधार संलग्न बचत खात्यात तीन हजार रुपये थेट लाभ वितरण प्रणालीद्वारे वितरीत झाल्यावर या योजनेंतर्गत विहीत केलेली अपकरणे खरेदी केल्याचे तसचे मन:स्वास्थ केंद्राद्वारे प्रशिक्षण घेतल्याचे लाभार्थ्यांचे देयक प्रमाणपत्र ३० दिवसांच्या आत संबधित सहाय्यक आयुक्त, समाजकल्याण यांच्याकडे प्रमाणित करून संबंधित केंद्रीय सामाजिक उपक्रम संस्थेमार्फत विकसित पोर्टलवर ३० दिवसांच्या आत अपलोड करणे आवश्यक राहील. अन्यथा लाभार्थ्यांकडून ही रक्कम वसूल करण्यात येईल. निवड/निश्चित केलेल्या जिल्ह्यात लाभार्थ्यांच्या संख्येपैकी ३० टक्के महिला असतील, जे अर्जदार वरील पात्रता निकषांची पूर्तता करतील. लाभार्थ्यांनाच मुख्यमंत्री वयोश्री योजनेमध्ये सहभागी होता येईल.

**आवश्यक कागदपत्रे पुढीलप्रमाणे :** १) अर्जदाराचे आधार कार्ड २) रहिवासी प्रमाणपत्र ३) ओळखपत्र ४) वयाचा पुरावा ५) रेशनकार्ड ६) अपंग असल्यास प्रमाणपत्र ७) मोबाईल नंबर ८) पासपोर्ट आकाराचा फोटो ही सर्व कागदपत्रे तुम्हाला मुख्यमंत्री वयोश्री योजनेसाठी ऑनलाईन किंवा ऑफलाईन अर्ज करताना सादर करायची आहेत.

**या योजनेचा लाभ कसा घ्यावा?**

सर्वप्रथम वयोश्री योजनेच्या https://www.alimco.in या अधिकृत संकेतस्थळाला भेट द्यायची आहे.

वेबसाईटवर गेल्यावर Mukhyamantri Vayoshri Yojana Apply Online साठी रजिस्ट्रेशन फॉर्म वर क्लिक करायचे.

काळजीपूर्वक फॉर्म भरायचा आहे, सर्व माहिती अचूक टाकायची आहे. माहिती चुकीची आढळल्यास अर्ज बाद होऊ शकतो.

सूचनेनुसार आवश्यक ते सर्व कागदपत्रे Soft Copyमध्ये अपलोड करायचे आहेत. शेवटी वयोश्री योजनेचा फॉर्म भरून झाल्यावर अर्ज सबमिट करायचा आहे. अशा रीतीने या योजनेचा लाभ घेण्यासाठी ऑनलाईन स्वरूपात अर्ज सादर करू शकता.

अधिक माहितीसाठी आपल्या जिल्हयातील समाज कल्याण विभाग सामाजिक न्याय व विशेष विभागास भेट द्यावी.

**या संदर्भातील शासन निर्णय**

https://gr.maharashtra.gov.in/Site/Upload/Government%20Resolutions/Marathi/२०२४०२०६१९४३३४४७२२...pdf या लिंकवर उपलब्ध आहे.

शासनामार्फत जेष्ठ नागरिकांसाठी विविध योजना उपक्रमे राबविण्यात येतात. ज्येष्ठ नागरिकांची लोकसंख्या एकूण लोकसंख्येच्या २१ टक्के होणार असल्याचे लक्षात घेऊन शासनाने भविष्यात ज्येष्ठ नागरिकांसाठी नवनवीन उपक्रम तयार केले आहेत. शासनामार्फत राबविण्यात येणाऱ्या योजना, उपक्रमांचा ज्येष्ठ नागरिकांनी मोठया प्रमाणात लाभ घ्यावा.

**-प्रवीण डोंगरदिवे, उपसंपादक,
विभागीय माहिती कार्यालय,
कोकण विभाग, नवी मुंबई**

## बदलते तंत्रज्ञान

### पंख्याची पाती थोडी वाकडी का असतात?

पंखा हा आपल्या दैनंदिन जीवनातला अविभाज्य घटक आहे. पंख्याविना घर ही कल्पनाच कोणी करू शकत नाही.



असा हा पंखा उन्हाळ्यात गारवा देतो तर हिवाळ्यात आराम करतो, पण जेव्हा फिरतो तेव्हा मात्र वीज खेचतो. कुठलाही पंखा कमी वेगाने फिरताना वीज कमी लागते आणि वेग जास्त असेल, तर जास्त वीज त्यासाठी खर्च होते.

घरात सारखा जो पंखा वापरला जातो, त्याच्या पात्यांवर (ब्लेड्स) एकाच कडेला धूळ जमते आणि ती काळी दिसू लागतात. जेव्हा आपण ती पुसतो तेव्हा लक्षात येतं पंख्याची पाती थोडी वाकडी असतात. का बरं सरळ नसावी, याचा कधी विचार केलाय? पंख्याची पाती सर्वसाधारणपणे १२ अंशांनी वाकलेली असतात. तो कोन १६ अंशांचा असेल तर खालच्या वस्तू उडू शकतात. या १२ अंशांमुळे वारा खाली फेकायला मदत होते. ब्लेडचा आकार बाहेरच्या बाजूला मोठा आणि वक्राकार असतो त्यामुळे वारा खेळता राहतो.

घरात साधारणपणे तीन ब्लेडचा पंखा वापरला जातो. जास्त ब्लेडने पंख्याच्या मोटरवर ताण येतो. दोन ब्लेडवाले पंखेसुद्धा असतात. त्यांची पाती लांब असतात व जास्त वारा देतात. पंखा विद्युत चुंबकत्वाच्या तत्त्वावर चालतो. खोलीच्या आकाराप्रमाणे ब्लेडची लांबी ठरविली जाते. २४ इंच ते ५६ इंच लांबीची ब्लेड घरासाठी वापरतात. मॉलमध्ये दीड मीटर लांबीचे आणि सात किंवा अधिक ब्लेड असलेले मोठे पंखे बघायला मिळतात. विमानतळावर अगदी हळू फिरणारे पंखे असतात. ते एका मिनिटात ३०-९० आवर्तने घेतात. त्यांचा व्यास २४ फूट असतो. मोठ्या खोलीत छोट्या ब्लेडचा पंखा उपयोगाचा नाही.

१०० स्क्वेअर फुटांच्या खोलीत ३६ इंच, २०० स्क्वेअर फूट असल्यास ४२ इंच आणि ४०० स्क्वेअर फूट असल्यास ५२ इंच पंखा लावावा, वाऱ्याचा स्थिर वेग आणि वाऱ्याचा दाब या दोन कारणांनी पंख्याची हवा खेळती होते. क्लॉकवाईज फिरणारे पंखे थंड प्रदेशात किंवा हिवाळ्यात वापरतात. त्यामुळे घरातील हीटिंग सिस्टीमची गरम हवा पंखा वर ओढून घेतो आणि पुन्हा खाली सोडतो. यामुळे हीटिंग सिस्टीमच्या ऊर्जेची बचत होते. एक्झॉस्ट फॅन खोलीच्या बाहेर हवा फेकतो. हा फॅन नॉर्मल फॅनसारखा वापरू शकतो का? हो, उलटा फिरवून लावला तर पंख्यासारखा वारा येईल, पण तो तेवढ्या क्षमतेने काम करू शकत नाही कारण निश्चित आकाराच्या खोलीतून बाहेर हवा फेकणे हे त्यांचं कार्य आहे.

# वक्त्या, कवयित्री सरोजिनी नायडू

## निमित्त



सरोजिनी नायडू यांचा जन्म १३ फेब्रुवारी १८७९ रोजी हैदराबाद येथे झाला. त्यांच्या आईचे नाव वरद सुंदरी होते. त्या एक कवयित्री होत्या आणि बंगालीमध्ये लिहायच्या. त्यांच्या वडिलांचे नाव अघोरनाथ चट्टोपाध्याय होते, जे प्रसिद्ध शास्त्रज्ञ आणि शिक्षणतज्ज्ञ होते.

'भारत कोकिळा' म्हणून प्रसिद्ध झालेल्या सरोजिनी यांनी वयाच्या अवघ्या १४व्या वर्षी सर्व इंग्रजी कवींच्या रचनांचा अभ्यास केला होता. १८९५मध्ये हैदराबादच्या निजामाने त्यांना शिष्यवृत्तीवर इंग्लंडला पाठवले. सरोजिनी नायडू या हुशार विद्यार्थिनी होत्या. त्यांना इंग्रजी, बंगाली, उर्दू, तेलुगू आणि पर्शियन भाषांचे चांगले ज्ञान होते. सरोजिनी यांचा विवाह १८९८मध्ये डॉ. गोविंद राजालू नायडू यांच्याशी वयाच्या १९व्या वर्षी झाला. त्यांनी घरीच इंग्रजीचा अभ्यास केला आणि वयाच्या १२व्या वर्षी मॅट्रिक पास केले. त्यांना तिचे शिक्षण पूर्ण करता आले नाही, परंतु इंग्रजी भाषेत कविता रचण्यात त्या हुशार होती.

नायडू यांनी गीत कविता या प्रकारात कविता निर्माण केल्या आणि त्यांच्या कविता १९०५, १९१२ आणि १९१७मध्ये प्रकाशित झाल्या. १९०६च्या कोलकाता अधिवेशनात गोखले यांच्या भाषणाने नायडू राजकारणात सक्रिय होण्यात महत्त्वाची भूमिका बजावली. भारतीय समाजात पसरलेल्या दुष्कृत्यांसाठी त्यांनी भारतीय महिलांना जागृत केले. भारताच्या स्वातंत्र्यासाठी विविध चळवळींमध्ये सहकार्य केले. त्या दीर्घकाळ काँग्रेसच्या प्रवक्त्या होत्या. जालियनवाला बाग हत्याकांडामुळे संतप्त होऊन त्यांनी १९०८मध्ये मिळालेला 'कैसर-ए-हिंद' सन्मान परत केला.

भारत छोडो आंदोलनात आगा खान राजवाड्यात त्यांना शिक्षा झाली. त्या उत्तर प्रदेशच्या पहिल्या महिला राज्यपाल झाल्या. कुशल राजकारणी असण्यासोबतच त्या चांगल्या लेखिकाही होत्या. १९०३ ते १९१७ या काळात त्या टागोर, गांधी, नेहरू आणि इतर नायकांनाही भेटल्या. १९१४मध्ये त्या लंडनमध्ये महात्मा गांधींना पहिल्यांदा भेटल्या आणि गांधीजींच्या व्यक्तिमत्त्वाने त्यांना खूप प्रभावित केले. त्या दक्षिण आफ्रिकेत गांधीजींच्या सहयोगी होत्या.

गोपाळकृष्ण गोखले यांना त्या आपले 'राजकीय पिता' मानत. त्यांच्या विनोदी स्वभावामुळे त्यांना 'जेस्टर इन गांधीजीज मिनी कोर्ट' असे संबोधले जात असे. ॲनी बेझंट आणि अय्यर यांच्यासोबत त्यांनी १९१५ ते १८ या काळात तरुणांमध्ये राष्ट्रीय भावना जागृत करण्यासाठी भारताचा दौरा केला. १९१९च्या सविनय कायदेभंगाच्या चळवळीत त्या गांधीजींच्या विश्वासू सहाय्यक होत्या.

१९१९मध्ये होमरूलच्या मुद्द्यावर त्या इंग्लंडला गेल्या. १९२२मध्ये त्यांनी खादी परिधान करण्याचे व्रत घेतले. १९२२ ते २६पर्यंत त्यांनी दक्षिण आफ्रिकेत भारतीयांच्या समर्थनार्थ आंदोलन केले आणि १९२८मध्ये गांधीजींचे प्रतिनिधी म्हणून त्या अमेरिकेला गेल्या.

सरोजिनी नायडू यांनी गांधीजींच्या अनेक सत्याग्रहांमध्ये भाग घेतला आणि छोडो भारत आंदोलनात त्या तुरुंगातही गेल्या. वयाच्या अवघ्या १३व्या वर्षी त्यांनी १३०० ओळींची 'द लेडी ऑफ लेक' ही कविता लिहिली. पर्शियन भाषेत 'मेहर मुनीर' हे नाटक लिहिले. 'द बर्ड ऑफ टाईम', 'द ब्रोकन विंग', 'निलांबुज', ट्रॅव्हलर्स सॉन्ग ही त्यांची प्रकाशित पुस्तके. २ मार्च १९४९ रोजी वयाच्या ७०व्या वर्षी हृदयविकाराच्या झटक्याने त्यांचे निधन झाले. स्वातंत्र्यलढ्यात महत्त्वाची भूमिका बजावणाऱ्या सरोजिनी नायडू यांनी भारताला स्वातंत्र्य मिळवून देण्यासाठी खूप संघर्ष केला. **(साभार : इंटरनेट)**

## क्लिक...क्लिक...!



**मुरुड : समुद्रकिनारी पर्यटकांना घोडागाडीचे प्रचंड आकर्षण असते. अशाच एका सायंकाळी समुद्रांच्या लाटांमधून पाणी उडवत जाणारी घोडागाडी व पर्यटक.** (छाया : सुधीर नाझरे)

## आरोग्य प्रहर

### ब्लड प्रेशर वाढल्यावर नियंत्रण मिळविण्याचे उपाय

आज कालच्या बिघडलेल्या लाईफ स्टाईलने अनेक आजारांना आमंत्रण मिळत आहे. त्यात उच्च रक्तदाब म्हणजे ब्लड प्रेशरचा त्रास अनेकदा कमी वयातही सुरू होत आहे. आपले खानपान, घर आणि ऑफीसचे टेन्शन आणि योग्य व्यायाम न केल्याने ब्लड प्रेशरचा त्रास वाढत असतो. ताण-तणावामुळे हायपरटेंशनचा त्रास होत असतो. हायपरटेंशन एक सायलेंट किलर असून त्याची लक्षण सहज ओळखता येत नाहीत. तुम्हालाही काही जर डोकेदुखी किंवा चक्कर येणे, अंधुक दिसणे अशा तक्रारी असतील तर लागलीच डॉक्टरांची भेट घ्या.



वारंवार डोकेदुखी, श्वास घेण्यात अडचणी, नसांमध्ये झिणझिण्या जाणवणे, चक्कर येणे ही उच्च रक्तदाबाची लक्षणे आहेत.हायपरटेंशनपासून वाचण्याचे सोपे उपाय.

**डाएट हेल्दी ठेवा –** हायपरटेंशनपासून वाचण्यासाठी आपल्या डाएटची काळजी घ्यावी. अरबट चरबट खाऊ नये. चुकीच्या खाण्याच्या सवयीने देखील हा आजार होतो.

**वजन नियंत्रित ठेवणे –** जर तुमचे वजन जास्त आहे तर वाढत्या वजनावर नियंत्रण ठेवा. जास्त वजन झाल्यासदेखील ब्लड प्रेशर वाढते.

**कमी मीठाचा वापर करणे –** आपण कमीत कमी मिठाचा आहारात वापर करावा. कमी मीठ खाल्याने तुमचे ब्लड प्रेशर नियंत्रणात राखण्यात मदत मिळते. मिठात सोडीयमचे प्रमाण असते ते ब्लड प्रेशर वाढविते.

**ताणतणाव वाढू देऊ नका –** जास्त विचार केल्याने ताणतणावामुळे देखील ब्लड प्रेशर वाढते. तुम्ही जेवढा ट्रेस घ्याल तेवढा ब्लड प्रेशर हाय होतो. यासाठी तुम्ही योगासने करा.

**योग आणि मेडीटेशन करा –** योग आणि मेडीटेशन देखील ताण-तणाव कमी करण्यास मदत करते. यष्टीकासन, हस्तपादांगुष्ठान, भद्रासन आणि मत्स्यासनसारखी आसने करा. योगासनाने रक्ताभिसरण चांगले होते. मन शांत होण्यास मदत होते.

**वेळेवर जेवण घ्या –** जेवण वेळेवर घ्यावे. जर तुम्ही वेळेवर जेवत नसाल तरी तुमचे ब्लड प्रेशर वाढू शकते. उपवास करू नये. उपवासाने देखील ब्लड प्रेशर वाढू शकते.

**खूप पाणी प्या –** जेवणासह तुम्ही पाणी पिण्याची सवय वाढवा. दिवसातून तीन लिटर पाणी तरी प्यायलाच हवे. सामान्य ब्लड प्रेशर ठेवण्यासाठी आपल्या डाएटमध्ये खजूराचा समावेश करावा. दालचिनी, मणूके, गाजर आणि आल्याचा सारख्या वस्तूंचा आहारात समावेश करावा. (ही माहिती सामान्य ज्ञानावर आधारित असून उपाय करण्यापूर्वी फॅमिली डॉक्टरांचा सल्ला घ्या)

# खोपोली नगरपालिका रुग्णालयाचा होणार कायापालट

## तीन कोटी निधी मंजूर; कामाचे भूमिपूजन

**खोपोली : प्रतिनिधी**

खोपोली नगरपालिका संचलित डॉ. बाबासाहेब आंबेडकर रुग्णालय व तालुक्यातील ग्रामीण भागासाठी आपत्कालीन स्थितीत आरोग्य आधारस्तंभ आहे, मात्र मागील काही वर्षांपासून या रुग्णालयाची दूरवस्था झाली आहे. या संदर्भात स्थानिकांनी आमदार महेंद्र थोरवे यांच्याकडे मागणी केली होती. त्याची दखल घेत आमदार थोरवे यांनी राज्य शासनाच्या माध्यमातून रुग्णालय अद्यावत होण्यासाठी तीन कोटींचा निधी उपलब्ध करून दिला.

रविवारी (दि. ११) रुग्णालय दुरूस्ती कामाचा भूमिपूजन सोहळा आमदार थोरवे यांच्या हस्ते झाला. या वेळी माजी नगराध्यक्ष दत्ताजी मसुरकर, सुमन औसरमल, मुख्याधिकारी पंकज पाटील, माजी उपनगराध्यक्ष राजू गायकवाड, ज्येष्ठ नगरसेवक मोहन औसरमल, शिवसेना शहर प्रमुख संदीप पाटील, हरीश काळे, माजी नगरसेविका केविना गायकवाड, जिनी सॅम्युयल, माजी नगरसेवक अमोल जाधव, रुग्णालयाच्या मुख्य वैद्यकीय अधिकारी डॉ. संगीता वानखेडे व अन्य पदाधिकारी उपस्थित होते.

सुधारित इमारतीत १० सामान्य बेड, पाच विशेष बेड व महिलांवर उपचारासाठी अतिरिक्त बेड असणार आहेत. तीन कोटी निधी प्राथमिक आराखडानुसार मंजूर असून वाढीव निधीची गरज भासल्यास तोही उपलब्ध केला जाईल, असे आश्वासन आमदार महेंद्र थोरवे यांनी दिले.




# मुगवली येथील श्री स्वयंभू मंदिरात गणेश जन्मोत्सव

**माणगाव : प्रतिनिधी**

श्री क्षेत्र मुगवली येथील श्री स्वयंभू गणपती मंदिरात मंगळवारी (दि.१३) श्रींचा जन्मोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे. या वेळी विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले असून नागरिकांनी त्याचा लाभ घ्यावा, असे आवाहन मंदिराच्या विश्वस्त मंडळाकडून करण्यात आले आहे.



श्री गणेश जन्मोत्सवानिमित्त सकाळी ७ ते ९ वा. श्री मूर्ती महापूजा सोहळा (अभिषेक) उपाध्याय राजू श्रीकृष्ण पंडित गोरेगाव, सकाळी ११ वाजता श्री गणेश जन्मोत्सव, कीर्तनभूषण हभप ज्ञानेश्वर मुरलीधर कपलाने (आळंदीकर), दुपारी १२.३९ वा. श्री गणेशजन्म, दुपारी १ वा. ढेपेताई (रायगड भूषण) व जिजामाता शिर्के (गुरुमाऊली सेवा पुरस्कार) रेश्मा बाबू खाडे, संजीवनी संजय भोजने, नवनाथ सत्संग मंडळ यांचे भजन, श्री गणेश यागारंभ, सायंकाळी ७.३० वा. याग पूर्णाहुती, रात्री १२.३० वाजता महानैवेद्य, महाआरती व प्रसाद असे कार्यक्रम होणार असून भाविकांनी या श्री गणेश जन्मोत्सव कार्यक्रमाला मोठ्या संख्येने उपस्थित रहावे, असे आवाहन मंदिराचे विश्वस्त अध्यक्ष तुकाराम म्हस्के, उपाध्यक्ष विठोबा म्हस्के, सचिव राजेंद्र म्हस्के, खजिनदार महादेव म्हस्के, सदस्य मिलिंद म्हस्के, नथुराम म्हस्के, नितीन म्हस्के, सुरेश म्हस्के, सीताराम म्हस्के, प्रकाश तेटगुरे, शांताराम वाघोस्कर यांच्यासह व्यवस्थापक श्री स्वयंभू स्वयंसेवक व ग्रामस्थ मंडळ मुगवली यांनी केले आहे.

# हळदीकुंकू समारंभातून सरकारी योजनांची माहिती

## भाजपच्या रिया कासार यांचा उपक्रम



**धाटाव : प्रतिनिधी**

भाजपच्या रोहा तालुका महिला मोर्चा सरचिटणीस रिया कासार यांच्या रोह्यातील निवासस्थानी सलग १६व्या वर्षी हळदीकुंकू कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. या कार्यक्रमास रोहा शहर व ग्रामीण भागातील असंख्य महिलांची उपस्थिती लाभली. आलेल्या सर्व महिलांना सौभाग्यलेणे असलेले हळदीकुंकू वाण कासार यांनी दिले.

महिलांसाठी सन्मान देणारे हळदीकुंकू म्हटले की सौभाग्याचे लेणे, महिलांसाठी हा आनंदाचा क्षण असतो, असे रिया कासार यांनी सांगितले. याचबरोबर आलेल्या सर्व महिलांना केंद्र व राज्य शासनाच्या योजनांची माहिती त्यांनी दिली.

कार्यक्रमास भाजप रायगड जिल्हा सरचिटणीस श्रद्धा घाग, ग्रामपंचायत सदस्य वैभवी भगत, रोहा महिला मंडळ माजी अध्यक्ष हर्षदा गुजर, शिक्षिका विद्या कुलकर्णी, लॅब टेक्निशियन दीपा चव्हाण, महिला बचत गट अध्यक्ष प्रजाती मयेकर, श्रीरंग रेसिडेन्सी महिला मंडळ, घरेलू कामगार महिला संघटना, रोहा महिला मंडळ, राष्ट्र सेवा समितीच्या महिला तसेच सामाजिक, सांस्कृतिक, शैक्षणिक, कला, क्रीडा अशा राजकीय सर्व क्षेत्रांतील महिलांची उपस्थिती होती.


प्रोसेस फी जमा रू. अर्जदारातर्फे वकील कु. सोनिया ना. शिरसाठ

**नोटीस जाहीर**

दिवाणी चौकशी अर्ज नं. १३२३/ २०२३
निशाणी–५

प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी साहेब सी.बी.डी. बेलापूर वाशी यांचे न्यायालयात

कनिझ मुक्बल अहमद शेख, ..... अर्जदार
आणि
कोणीही नाही ..... जाबदार

सर्व लोंकाना या नोटिसद्वारे कळविण्यात येते की,

ज्याअर्थी, **कै. फतिमाबाई अब्दुल सत्तार शेख** यांचे दि. ०९.०६.२०२० रोजी घर नं. ६२७९/००५, **हनुमान नगर, तुर्भे नाका, तालुका– ठाणे, जिल्हा– ठाणे, महाराष्ट्र** येथे निधन झाले असून त्यांचे कायदेशिर सरळ वारस म्हणून अर्जदार **कै. फतिमाबाई अब्दुल सत्तार शेख रा. घर नं. ६२७९/००५, हनुमान नगर, तुर्भे नाका, तालुका– ठाणे, जिल्हा– ठाणे, महाराष्ट्र** यांनी खालील वर्णनाच्या मिळकतीबाबत वारसा दाखला मिळणेकरिता अर्ज केलेला आहे.

**मिळकतीचे वर्णन**

घर नं. ६२७९/००५, हनुमान नगर, तुर्भे नाका, नवी मुंबई ४००७०३.
**(लेखा VA 0002214639) (सर्वे पावती कं. डी झेड जी III 1751)**

वरील अर्जदार हे मयत कै. फतिमाबाई अब्दुल सत्तार शेख यांचे वारस आहेत, या हक्काबद्दल कोणीही व्यक्तीला हरकत असल्यास, त्यांनी सदर नोटीस प्रसिध्द झाल्यापासून एक महिन्याच्या आत, या मे. कोर्टात हजर राहून हरकत घेतली नाही तर हे मे. कोर्ट वरील अर्जदार यांच्या अर्जा कामी पुरावा घेण्याची कार्यवाही करील, तसेच अर्जदार हे **कै. फतिमाबाई अब्दुल सत्तार शेख** यांचे वारस असल्याने शाबीत झाले तर त्यांस वारसादाखला मंजूर करील याची दखल घ्यावी.

रोजी माझी सही न्यायालयाच्या शिक्कयासह दिली.

आज दि.:– १२/०२/२०२३

कोर्टाचा शिक्का

**सहा. अधीक्षक**
**सही/–**
By Order
Navi Mumba
Asst. Supdt.
C.J.J.D Belapur, Navi Mumb



**Shri Sunil Sadanadn Gadre**
**Recovery officer**
**Government of Maharashtra (Co-Op Departement)**
**Office : Kamal Mahila Nagari Sahakari Patpedhi Maryadit, Panvel 626/A/7B Shrikrushna Nivas, Near Ramdas Maruti Mandir, Tilak Road, Panvel, Dist. Raigad, Pin Code : 410206,**
**Mobile No 8082555408, kamalmahila@yahoo.in**

**FORM Z**

**(See Sub-rule [11(d-11)] of rule 107)**

**Possession Notice For Immoveble Property**

Whereas the undersigned being the Recovery Officer of **Kamal Mahila Nagari Sahakari Patpedhi Maryadit, Panvel** Under The Maharashtra Co-operative Societies Rule, 1961 issued a demand notice dated 28/04/2023 calling upon the judgment debtor **1) Smt. Rohini Dhondu Mungaji, 2) Smt. Varsha Santosh Mhatre, 3) Smt. Mangesh Ramchandra Zemase** to repay the amount mentioned in the notice being **Rs. 14,09,144/- (Rs. Fourteen Lakh Nine Thousand One Hundred Forty Four Only)** with date of receipt of the said notice and the judgment debtor having failed to repay the amount, the undersigned has issued a notice for attachment dated 03/07/2023 and attached the property describe herein below and same has been attached the property on 21/07/2023.

The judgment debtor having failed to repay the amount, notice is hereby given to the judgments debtors and the public in general that the undersigned has taken possession of the property described herein below in exercise of powers conferred on her under rule 107 [11(d-11)] of The Maharashtra Co-operative Societies Rule, 1961 on this **21/07/2023**

The judgment debtors in particular and the public in general are hereby cautioned not to deal with the property and any dealings with the property will be subject to the charge of **The Kamal Mahila Nagari Sahakari Patpedhi Maryadit Panvel** as on dated 12/02/2024 for an amount **Rs. 13,50,045/- (Rs. Thirteen Lakh Fifty Thousand Forty Five Only)** and interest thereon.

**Description of the Immovable Property**

| Village | Name Of the Property owner | Discription of Property | Area |
|---|---|---|---|
| At- Panvel, Trimurti Sahaniwas CHS LTD. Tal- Panvel, Dist- Raigad. | Smt. Rohini Dhondu Mungaji | Panvel Mahanagar Palika, Panvel, Tal- Panvel, Dist- Raigad, CTS No. 1572(1) and 1572, Flat No. A-7, 1st Floor A wing, Trimurti Sahaniwas CHS LTD. Shivaji Road, Panvel 410203 | 808 Sq. Ft. Carpet |

All that Part and parcel of the property located at Panvel, Tal- panvel, Dist Raigad, within the registration Tahasil panvel And District Raigad.

**Date : 12/02/2024**
**Place : panvel**

**Sd/-**
**(Sunil Sadanand Gadre)**
Recovery Officer
Maharashtra Government
[Co-operative Department]



**Shri Sunil Sadanadn Gadre**
**Recovery officer**
**Government of Maharashtra (Co-Op Departement)**
**Office : Kamal Mahila Nagari Sahakari Patpedhi Maryadit, Panvel 626/A/7B Shrikrushna Nivas, Near Ramdas Maruti Mandir, Tilak Road, Panvel, Dist. Raigad, Pin Code : 410206,**
**Mobile No 8082555408, kamalmahila@yahoo.in**

**FORM Z**

**(See Sub-rule [11(d-11)] of rule 107)**

**Possession Notice For Immoveble Property**

Whereas the undersigned being the Recovery Officer of **Kamal Mahila Nagari Sahakari Patpedhi Maryadit, Panvel** Under The Maharashtra Co-operative Societies Rule, 1961 issued a demand notice dated 19/05/2019 calling upon the judgment debtor **1) Mr. Changdev Chandar Bahira, 2) Mr. Rahul Vasant Koli, 3) Mr. Navnath Hari Koli** to repay the amount mentioned in the notice being **Rs. 2013698/- (Rs. Twenty Lakh Thirteen Thousand Six Hundred Ninety Eight Only)** with date of receipt of the said notice and the judgment debtor having failed to repay the amount, the undersigned has issued a notice for attachment dated 30/11/2022 and attached the property describe herein below and same has been attached the property on 12/12/2022.

The judgment debtor having failed to repay the amount, notice is hereby given to the judgments debtors and the public in general that the undersigned has taken possession of the property described herein below in exercise of powers conferred on her under rule 107 [11(d-11)] of The Maharashtra Co-operative Societies Rule, 1961 on this **12/12/2022**

The judgment debtors in particular and the public in general are hereby cautioned not to deal with the property and any dealings with the property will be subject to the charge of **The Kamal Mahila Nagari Sahakari Patpedhi Maryadit Panvel** as on dated 12/02/2024 for an amount **Rs. 24,17,540/- (Rs. Twenty Four Lakh Seventeen Thousand Five Hundred Forty Only)** and interest thereon.

**Description of the Immovable Property**

| Village | Name Of the Property owner | Discription of Property | Area |
|---|---|---|---|
| At- Panvel, Kandpile Residency, Tal- Panvel, Dist- Raigad. | Mr. Changdev Chandar Bahira | Panvel Mahanagar Palika, Panvel, Tal- Panvel, Dist- Raigad, takka Gaon, Final Plot No. 292, Sub Plot No. 2, Kandpile Residency, B- Wing, 3rd Floor, Flat No. 304, Area 516 Sq. Ft. Carpet. | 516 Sq. Ft. Carpet |

All that Part and parcel of the property located at Panvel, Tal- panvel, Dist Raigad, within the registration Tahasil panvel And District Raigad.

**Date : 12/02/2024**
**Place : panvel**

**Sd/-**
**(Sunil Sadanand Gadre)**
Recovery Officer
Maharashtra Government
[Co-operative Department]



**श्री. सुनिल सदानंद गद्रे**
**वुसली अधिकारी**
**सहकार विभाग, महाराष्ट्र शासन नियुक्त**
**द्वारा : कमळ महिला नागरी सहकारी पतपेढी मर्यादित, पनवेल, ६२६ अे/७ बी, श्रीकृष्ण निवास, रामदास मारूती शेजारी, टिळक रोड, पनवेल. जि. रायगड. पिन कोड ४१०२०६.**
**मोबाईल नंबर : ८०८२५५५४०८**

**जाहिरात तात्काळ**

नमुना झेड
( नियम १०७ पोट–नियम (११ (ड ११) पहा)
स्थावर मालमत्तेचा ताबा घेण्याबाबतची नोटीस

ज्या अर्थी खाली सही केलेले वसुली अधिकारी कमळ महिला नागरी सहकारी पतपेढी मर्यादित, पनवेल हे महाराष्ट्र महाराष्ट्र सहकारी संस्था नियम, १९६१ अन्वये असून दि. २८.०४.२०२३ रोजी ऋणको १) श्रीमती रोहिणी धोंडू मुंगाजी २) श्रीमती वर्षा संतोष म्हात्रे ३) श्रीमती मंगेश रामचंद्र झेमसे यांना मागणी नोटीस देऊनही नोटीशीमध्ये नमुद केलेली रक्कम रू.१४,०९,१४४ (अक्षरी रूपये चौदा लाख नऊ हजार एकशे चव्वेचाळीस मात्र.) व दिनांक ०६/११/२०२० पासून १४ टक्के प्रमाणे व्याज वसुली दाखल्यातील तपशिलाप्रमाणे कर्ज खात्यात १५ दिवसांचे आत भरणेबाबत कळविले होते आणि ऋणको याने रक्कम जमा करण्यास कसूर केली आहे, त्यामुळे खाली सही करणार यांनी दि. ०३.०७.२०२३ रोजी जप्तीची नोटीस दिली असून, पुढे निर्दिष्ट केलेली स्थावर मालमत्ता २१.०७.२०२३ रोजी जप्त करण्यात आली आहे.

ऋणकोने रक्कम जमा करण्यास कसूर केल्यामुळे, ऋणकोला याप्रमाणे नोटिस देण्यात येत आहे आणि सर्व नागरिकांना, खाली निर्दिष्ट केलेल्या मालमत्तेचा खाली सही करणाऱ्याने त्याला महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६१ मधील नियम १०७ पोट–नियम [११ (ड–११)] अन्वये दिलेल्या अधिकारानुसार खालील स्थावर मिळकतीची जप्ती केली आहे.

विशेषकरून ऋणकोला आणि सर्व नागरिकांना याव्दारे सावध करण्यात येत आहे की, मालमत्तेसंबंधी कोणताही व्यवहार करू नये आणि व्यवहार केल्यास कमळ महिला नागरी सहकारी पतपेढी (मर्या.) पनवेल यांच्या बोजाची रक्कम दि. १२/०२/२०२४ रोजी रू.१३,५०,०४५/– (अक्षरी रूपये तेरा लाख पन्नास हजार पंचेचाळीस मात्र) आणि त्यावरील व्याज याला आधीन रहावे लागेल.

**महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६०** (नमुना 'झेड')
**स्थावर मालमत्तेचे वर्णन**

पनवेल महानगरपालिका हद्दीतील आणि सब रजिस्ट्रार पनवेल यांचे अधिकार कक्षेतील मौजे पनवेल, ता. पनवेल, जि. रायगड येथील सीटीएस नं. १५७२ (१) बी आणी १५७२ वरील, त्रिमुर्ती सहनिवास को.ऑप. हौ. सोसायटी लिमिटेड, मधील फ्लॅट नं. अे–७, पहिला मजला, अे विंग, ज्याचे क्षेत्र ८०८ चौ. फुट कारपेट ही मिळकत.

| गावाचे नाव | मालमत्ता धारकाचे नाव | मिळकतीचे वर्णन | क्षेत्र |
|---|---|---|---|
| मौजे पनवेल, ता. पनवेल जि. रायगड. | श्रीमती रोहिणी धोंडू मुंगाजी | पनवेल महानगरपालिका हद्दीतील आणि सब रजिस्ट्रार पनवेल यांचे अधिकार कक्षेतील मौजे पनवेल, ता. पनवेल, जि. रायगड येथील सीटीएस नं. १५७२ (१) बी आणी १५७२ वरील, त्रिमुर्ती सहनिवास को.ऑप. हौ. सोसायटी लिमिटेड, मधील फ्लॅट नं. अे–७, पहिला मजला, अे विंग, ज्याचे क्षेत्र ८०८ चौ. फुट कारपेट ही मिळकत. | ८०८ चौ. फुट कारपेट |

**दिनांक : १२/०२/२०२४**
**ठिकाण : पनवेल**

**सही/–**
**सुनिल सदानंद गद्रे**
**वसुली व विकी अधिकारी**
**महाराष्ट्र शासन (सहकार खाते)**



**श्री. सुनिल सदानंद गद्रे**
**वुसली अधिकारी**
**सहकार विभाग, महाराष्ट्र शासन नियुक्त**
**द्वारा : कमळ महिला नागरी सहकारी पतपेढी मर्यादित, पनवेल, ६२६ अे/७ बी, श्रीकृष्ण निवास, रामदास मारूती शेजारी, टिळक रोड, पनवेल. जि. रायगड. पिन कोड ४१०२०६.**
**मोबाईल नंबर : ८०८२५५५४०८**

**जाहिरात तात्काळ**

नमुना झेड
( नियम १०७ पोट–नियम (११ (ड ११) पहा)
स्थावर मालमत्तेचा ताबा घेण्याबाबतची नोटीस

ज्या अर्थी खाली सही केलेले वसुली अधिकारी कमळ महिला नागरी सहकारी पतपेढी मर्यादित, पनवेल हे महाराष्ट्र महाराष्ट्र सहकारी संस्था नियम, १९६१ अन्वये असून दि.१९.०५.२०१९ रोजी ऋणको १) श्री. चांगदेव चंदर बहिरा २) श्री राहुल वसंत कोळी ३) श्री. नवनाथ हरि कोळी यांना मागणी नोटीस देऊनही नोटीशीमध्ये नमुद केलेली रक्कम रू.२०,१३,६९८– (अक्षरी रूपये वीस लाख तेरा हजार सहाशे अठ्ठयाण्ण व मात्र.) व दिनांक ०१/०१/२०२० पासून १३ टक्के प्रमाणे व्याज वसुली दाखल्यातील तपशिलाप्रमाणे कर्ज खात्यात १५ दिवसांचे आत भरणेबाबत कळविले होते आणि ऋणको याने रक्कम जमा करण्यास कसूर केली आहे, त्यामुळे खाली सही करणार यांनी दि. ३०.११.२०२२ रोजी जप्तीची नोटीस दिली असून, पुढे निर्दिष्ट केलेली स्थावर मालमत्ता १२.१२.२०२२ रोजी जप्त करण्यात आली आहे.

ऋणकोने रक्कम जमा करण्यास कसूर केल्यामुळे, ऋणकोला याप्रमाणे नोटिस देण्यात येत आहे आणि सर्व नागरिकांना, खाली निर्दिष्ट केलेल्या मालमत्तेचा खाली सही करणाऱ्याने त्याला महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६१ मधील नियम १०७ पोट–नियम [११ (ड–११)] अन्वये दिलेल्या अधिकारानुसार खालील स्थावर मिळकतीची जप्ती केली आहे.

विशेषकरून ऋणकोला आणि सर्व नागरिकांना याव्दारे सावध करण्यात येत आहे की, मालमत्तेसंबंधी कोणताही व्यवहार करू नये आणि व्यवहार केल्यास कमळ महिला नागरी सहकारी पतपेढी (मर्या.) पनवेल यांच्या बोजाची रक्कम दिनांक १२.०२.२०२४ रोजी रू. २४,१७,५४०/– (अक्षरी रूपये चोवीस लाख सतरा हजार पाचशे चाळीस मात्र) आणि त्यावरील व्याज याला आधीन रहावे लागेल.

**महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६०** (नमुना 'झेड')
**स्थावर मालमत्तेचे वर्णन**

पनवेल महानगरपालिका यांचे हद्दीतील आणि सब रजिस्ट्रार पनवेल यांचे अधिकार कक्षेतील मौजे पनवेल, तक्का गाव, फायनल प्लॉट नं २९२, सब प्लॉट नंबर २ वरील कांडपिळे रेसिडेंन्सी मधील बी विंग तीसऱ्या मजल्यावरील फ्लॅट नं. ३०४ क्षेत्र ५१६ चौ. फुट कारपेट ही मिळकत.

| गावाचे नाव | मालमत्ता धारकाचे नाव | मिळकतीचे वर्णन | क्षेत्र |
|---|---|---|---|
| मौजे पनवेल, ता. पनवेल जि. रायगड. | श्री. चांगदेव चंदर बहिरा | पनवेल महानगरपालिका यांचे हद्दीतील सब रजिस्ट्रार पनवेल यांचे अधिकार कक्षेतील मौजे पनवेल, तक्का गाव, फायनल प्लॉट नं २९२, सब प्लॉट नंबर २ वरील कांडपिळे रेसिडेंन्सी मधील बी विंग तीसऱ्या मजल्यावरील फ्लॅट नं. ३०४ क्षेत्र ५१६ चौ. फुट कारपेट ही मिळकत. | ५१६ चौ. फुट कारपेट |

**दिनांक : १२/०२/२०२४**
**ठिकाण : पनवेल**

**सही/–**
**सुनिल सदानंद गद्रे**
**वसुली व विकी अधिकारी**
**महाराष्ट्र शासन (सहकार खाते)**

# नवी मुंबई मनपाच्या स्वच्छता उपक्रमास उत्स्फूर्त प्रतिसाद

## चित्रकला स्पर्धेत दोन लाख ८३ हजार १४४ मुलांचा सहभाग; विजेत्यांचा सन्मान

**नवी मुंबई : बातमीदार**

स्वच्छ सर्वेक्षण २०२३ अंतर्गत नवी मुंबई महापालिकेने विविध उल्लेखनीय उपक्रम राबवले. इंडियन स्वच्छता लीग अंतर्गत राबविलेल्या तीन अभिनव उपक्रमांची बेस्ट ऑफ इंडिया रेकॉर्ड्समध्ये विक्रमी नोंद झालेली आहे. यामधील एक विशेष उपक्रम म्हणजे विद्यार्थ्यांच्या स्वच्छताविषयक संकल्पनांना मुक्त वाव देणारी स्वच्छ चित्रकला स्पर्धा. या स्पर्धेत पहिली ते दहावीच्या वर्गातील दोन लाख ८३ हजार १४४ मुले यामध्ये सहभागी झाली. या स्पर्धेमधील विजेत्यांना आयुक्त राजेश नार्वेकर यांच्या हस्ते गौरविण्यात आले.

इयत्तेनुसार तीन गटांमध्ये घेण्यात आलेल्या या स्वच्छ चित्रकला स्पर्धेमध्ये सर्व गटातून सर्वोत्तम चित्रकार म्हणून नमुंमपा शाळा क्रमांक १५, शिरवणे येथील विद्यार्थी विवेक विलास संगा आणि विद्याभवन हायस्कूल, नेरूळ येथील विद्यार्थी साई शिंदे यांना लॅपटॉप देऊन सन्मानित करण्यात आले. इ. पहिली ते चौथीच्या गटात फादर ॲग्नेल मल्टीपर्पज स्कूल, वाशी येथील विद्यार्थिनी सान्वी सुरेश सुतार हिने प्रथम, नमुंमपा शाळा क्रमांक ९१, दिवा येथील विद्यार्थी प्रथम प्रसाद साटम याने द्वितीय व तेरणा विद्यालय नेरूळ येथील विद्यार्थी तनुष नरेंद्र मेजोर याने तृतीय क्रमांक पटकाविला.




इ. पाचवी ते आठवीच्या गटात डीएव्ही पब्लिक स्कूल, नेरूळ येथील विद्यार्थिनी प्राजक्ता सरकार प्रथम क्रमांकाची मानकरी ठरली, तसेच रॉयल ख्रिश्चन स्कुल, वाशी येथील विद्यार्थी स्वराज्य स्वपन जाना याने द्वितीय क्रमांक व पोदार इंटरनॅशनल स्कूल, नेरूळ येथील विद्यार्थी अमेय निळकंठ बोरसे याने तृतीय क्रमांक पटकाविला.

इ. नववी व दहावीच्या गटात विद्याभवन हायस्कूल, नेरूळ येथील विद्यार्थी अंकित धारा याने प्रथम क्रमांकाचे तसेच शिरवणे विद्यालय, नेरूळ येथील विद्यार्थी मंथन भोईर याने द्वितीय आणि न्यू बॉम्बे सिटी स्कूल, नेरूळ येथील तनिष्क सुळे या विद्यार्थ्याने तृतीय क्रमांकाचे पारितोषिक संपादन केले.

दीपावली उत्सवामध्ये आयोजित किल्ला स्पर्धेमध्ये सेक्टर ८, नेरूळ येथील त्रिमूर्ती अपार्टमेंटमध्ये वैभव निकारे आणि सहकाऱ्यांनी बनवलेल्या किल्ल्याला प्रथम क्रमांकाचे व सेक्टर ८, नेरूळ येथील गुरुकृपा सोसायटीमध्ये तनिष रवींद्र शिर्के आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी बनवलेल्या किल्ल्याला द्वितीय क्रमांकाच्या पारितोषिकाने गौरविण्यात आले.

सध्याच्या सोशल मीडियाप्रेमी डिजिटल युगात सदर किल्ले स्पर्धेचे गुणांकन सोशल मीडियावर किल्ल्याची छायाचित्रे अपलोड करून त्यावर मिळालेल्या लाईक्सची मोजणी करून देण्यात आले. यामध्ये प्रथम क्रमांकाच्या किल्ल्यास १०५८ आणि द्वितीय क्रमांकाच्या किल्ल्यास ७१६ लाईक्स प्राप्त झाले होते. या स्पर्धेच्या पारितोषिक वितरणप्रसंगी विद्यार्थ्यांच्या पालक व शिक्षकांनीही उपस्थिती दर्शवली होती.

## निवडक



### श्री ब्रह्मचैतन्य मासिक संगीत सभा

**पनवेल** : श्री ब्रह्मचैतन्य मासिक संगीत सभेचे २७वे पुष्प पनवेल येथील गोंदवलेकर महाराज नामस्मरण केंद्रात झाले. या कार्यक्रमात पुणे येथील प्रसिद्ध शास्त्रीय गायिका देवश्री नवघरे-भिडे यांची गायन सेवा झाली. विदुषी मंजिरी असनारे-केळकर यांच्याकडे संगीताचे शिक्षण घेतलेल्या देवश्री यांनी संगीत सभेची सुरुवात 'गावती' या रागाने केली. 'धन धन बालमा मोरे घर आये' ही विलंबित एकातालातील बंदिश गाऊन त्यानंतर द्रुत एकतालातील 'मोसे मत रोको सैय्या' ही बंदिश सादर केली. त्यानंतर तिलक कामोद रागामध्ये एक तराणा त्यानी सादर केला. त्यांना नंदकुमार कर्वे यांनी हार्मोनियम, मिलिंद नाईक यांनी तबला, संतोष खैरे यांनी पखवाज व चैतन्य कोशे यांनी तालवाद्य साथ केली. समीर सोमण यांनी कार्यक्रमाचे निवेदन केले.

### करंजा येथे अजगराला जीवदान

**उरण :** तालुक्यातील म्हातवली येथे राहणारे सर्पमित्र नितीन घरत यांनी नुकतेच करंजा-कोंढरीपाडा येथे जाऊन अजगरास पकडून जीवदान दिले. सर्पमित्र नितीन घरत हे केअर ऑफ नेचर संस्थेचे सदस्य आहेत. अजगर सुमारे साडेआठ फुट लांब होता. सर्पमित्र नितिन घरत हे केअर ऑफ नेचर संस्थेचे सदस्य असून गेली १० वर्षांपासून सुमारे पाच हजारांहून जास्त विषारी व बिनविषारी साप पकडून जंगलात सुरक्षित जागी सोडले आहेत. त्यांना जीवदान दिले आहे. जर कुणाला साप दिसला तर सर्पमित्र नितिन घरत (८३५५८१५९७६) संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे.



### कार्यकर्त्यांचा शिवसेनेत प्रवेश



**नवी मुंबई :** मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वावर विश्वास ठेवत नवी मुंबईतील ठाकरे गटातील प्रमुख पदाधिकारी तसेच समाजवादी पक्ष, मुस्लिम समाजातील अनेक प्रतिष्ठित व्यक्ती आणि आंबेडकरवादी नेत्यांनी आपल्या शेकडो समर्थकांसह शिवसेनेचे उपनेते विजय नाहटा यांच्या नेतृत्वाखाली नेरूळमधील एका सोहळ्यात शिवसेनेत जाहीर प्रवेश केला. या वेळी शिवसेना महिला जिल्हा संघटक सरोज रोहिदास पाटील, उपजिल्हा प्रमुख दिलीप घोडेकर, नवी मुंबई शहर प्रमुख विजय माने, उत्तर भारतीय सेनाध्यक्ष कमलेश वर्मा, माजी नगरसेवक ज्ञानेश्वर सुतार आदी उपस्थित होते. विजय नाहटा यांनी शिवसेनेत प्रवेश केलेल्यांना पक्षातील महत्त्वाच्या जबाबदारी देत नियुक्तीपत्रे दिली.

### नवी मुंबईत 'समाजकार्याचा राजा'

**नवी मुंबई** : श्री माघी गणेश जयंतीनिमित्त जयश्री फाउंडेशनच्या माध्यमातून नेरूळ सेक्टर १६ अ येथे गणपती बाप्पाची स्थापना करण्यात येणार आहे. दरवर्षी प्रमाणे गरीब व गरजू विद्यार्थ्यांना शालेय साहित्य वह्या, लेखन साहित्य जमा करून देण्यात येणार आहे तसेच लहान मुलांनासुद्धा सांस्कृतिक व नैसर्गिक शिकवण देण्यासाठी शाडू मातीचे गणपती बनवण्याचा लहानसा उपक्रम राबवला आहे. त्याचबरोबर महाप्रसादाचेदेखील आयोजन या युवक मंडळींकडून करण्या आले आहे. समाजकार्याच्या राजाच्या दर्शनाला येताना तुम्ही शैक्षणिक साहित्य आणा, असे आवाहन मंडळातर्फे करण्यात आले आहे.

# नामांकित खाद्यपदार्थांचे लेबल बदलून विक्री

## अन्न व औषध प्रशासनाकडून कारवाई

**नवी मुंबई : बातमीदार**

तुर्भे औद्योगिक वसाहतीमध्ये नामांकित कंपनीचे खाद्यपदार्थ आणि थंडपेय साठवून त्यावरील माहितीची लेबल बदलली जात होती. या संपूर्ण कारभाराबाबत शंका असल्याने अन्न व औषध प्रशासनाला याची तक्रार करण्यात आली होती. अन्न व औषध प्रशासनाने या गोदामांची झाडाझडती घेतल्यावर अन्नसुरक्षा मानक कायद्याची पायमल्ली केल्याचे आढळून आल्याने अधिकाऱ्यांनी २४ लाख रुपये किंमतीची उत्पादने सील करून अधिक तपास सुरू केला आहे.

तुर्भे औद्योगिक वसाहतीमधील एका गोदामात मोठ्या प्रमाणात वेफर्स, कुरकुरे, थंड पेय याचा साठा करून ठेवण्यात आला होता. या साठ्यावर निर्यातीच्या नावाखाली रसायन वापरून उत्पादन तारीख बदलून साठ्यातील उत्पादनांची छापील माहिती बदलवून याची विक्री करण्यात येत होती.



यासंदर्भात परिसरातील पुढाऱ्यांनी अन्न व औषध प्रशासन अधिकाऱ्यांना तक्रार करून गोदामांची तपासणी करण्यासाठी मागणी केली होती.

सुमारे १० तास या सर्व गोदामांची तपासणी केली. यामध्ये विदेशात ही सर्व उत्पादने पाठवण्यात येणार असल्याने उत्पादनातील माहिती बदलली जात असल्याचे विक्रेत्यांनी सांगितले, मात्र यासाठी आवश्यक कोणतेही परवाने नसल्याचे अन्न व औषध विभागातील अधिकाऱ्यांच्या तपासात स्पष्ट झाल्यावर अधिकाऱ्यांनी तपासणीसाठी नमुने गोळा करून हे नमुने प्रयोगशाळेत पाठविले आहेत. गोदामातील इतर उत्पादने जप्त करून सिल करण्यात आले आहेत.

अधिकाऱ्यांच्या पथकाने अत्यंत सखोल चौकशी करून मानक कायद्यातील सर्वच तरतुदींचा भंग होत असल्याचे निदर्शनास आले असून या विक्रेत्यांवर फौजादरी गुन्हा नोंद करून कठोर कारवाई करण्याची मागणी करण्यात आली आहे.



# खारघरमधील हायवे ब्रेक हॉटेलला आग

**पनवेल : वार्ताहर**

खारघरमध्ये रविवारी (दि.११) मध्यरात्री हायवे ब्रेक हॉटेलला भीषण आग लागली असून त्यात लाखो रुपयांचे नुकसान झाल्याची प्राथमिक माहिती समोर आली आहे.

खारघर शहरातील नेहमी गजबजलेले असलेले सेक्टर १० परिसरातील हायवे ब्रेक हॉटेलला आग लागली. रात्रीच्या सुमारास सर्व काम आटपून कामगार हॉटेल बंद करून घरी गेले होते, मात्र मध्यरात्रीच्या सुमारास या हॉटेलला अचानक आग लागली. या लागलेल्या आगीत हॉटेलमधील फ्रिज, खाण्याचे साहित्य, टेबल, खुर्च्या त्यांच्यासह स्वयंपाकघरातील भांडी आदी साहित्य आगीत जळून खाक झाल्याचे दिसून आले.

हॉटेलमधील लाखो रुपयांच्या साहित्याच्या नुकसान झाल्याची माहिती समोर आली आहे, मात्र आग कशामुळे लागली हे अद्याप निष्पन्न झाले नाही. त्या आगीमध्ये हायवे ब्रेक हॉटेल जळून खाक झाले आहे. हॉटेलला मध्यरात्री आग लागली. या आगीची माहिती अग्निशामक दलाला देण्यात आली. त्यानंतर अग्निशामक दलाच्या गाड्या घटनास्थळी दाखल झाल्या.

अग्निशामक दलाच्या जवानांनी अथक प्रयत्नानंतर या आगीवर नियंत्रण मिळवले. आग शॉर्टसर्किटमुळे लागली असल्याचे सांगितले जात आहे. या आगीमध्ये हॉटेलचे मोठे नुकसान झाले आहे. यात कोणतीही जीवितहानी झाली नसल्याचे समोर आले आहे.

# २०० रामभक्तांनी घेतले रामलल्लाचे दर्शन

## आमदार मंदा म्हात्रे यांच्याकडून स्वखर्चाने यात्रा



**नवी मुंबई : बातमीदार**

नवी मुंबईतून अयोध्येपर्यंत आस्था स्पेशल ट्रेनच्या माध्यमातून बेलापूर विधानसभा मतदार संघातील आमदार मंदा म्हात्रे यांच्या सहकार्याने २०० रामभक्तांनी अयोध्यातील प्रभू श्री रामलल्लाचे दर्शन घेतले.

सुमारे ५०० वर्षांचा प्रदीर्घ संघर्ष आणि हजारो बलिदानानंतर अयोध्येत उभारलेल्या या भव्य राम मंदिरात रामलल्लाचे दर्शन घेण्यासाठी जगभरातील रामभक्त आतुरतेने वाट बघत आहेत. नवी मुंबईकरदेखील या दर्शनासाठी वाट पाहत आहेत.

आमदार मंदा म्हात्रे यांनी बेलापूर विधानसभा क्षेत्रातील दिवाळे, बेलापूर, नेरूळ (पश्चिम) व सानपाडा विभागामधील २०० रामभक्तांना मोफत दर्शन घडवले. नेरूळ येथील रामभक्त बापू लटांबळे, राजेंद्र जाधव, शेखर पाटील, तसेच सानपाडामधील कारभारी बडे, नाना शिंदे, मनीषा आंबेकर बेलापूर मधील उज्वला म्हात्रे, ज्योती पाटील, सुमती तांडेल, यांनी सांगितले की, गेल्या अनेक दिवसांपासून देशवासियांनी प्रभू श्री रामलल्लाचे दर्शन घेण्याची इच्छा होती.

आमदार मंदा म्हात्रे सहकार्याने आम्हा बेलापूर विधानसभा क्षेत्रातील २०० जणांना प्रभू रामलल्लाचे दर्शन घडले.

### गुरुजी स्नेहसंमेलनात मान्यवरांची हजेरी

**नवी मुंबई** : विद्याभवन शिक्षण संकुलात गुरुजी एज्युकेशनचे स्नेहसंमेलन झाले. या वेळी आयआयटी इंदौरचे माजी चेअरमन पद्मश्री डॉ. दीपक फाटक, पुणे मनपा कामगार युनियनच्या जनरल सेक्रेटरी मुक्ता मनोहर, उद्योगपती मदन दोडेजा आदींनी हजेरी लावली.

# 'लोकसहभागामुळे नवी मुंबई शहर स्वच्छतेत आघाडीवर'

**नवी मुंबई : बातमीदार**

स्वच्छ सर्वेक्षण २०२३मध्ये मिळालेले उज्वल यश हे सर्वांच्या सामुहिक प्रयत्नांमुळे मिळालेले असून यावर्षी नवी मुंबई शहराने देशात द्वितीय क्रमांकाच्या स्वच्छ शहराचा बहुमान प्राप्त केला, तसेच कचरामुक्त शहराचे सर्वोच्च सेव्हन स्टार रेटींग मिळवले, यामुळे आपली जबाबदारी वाढलेली असल्याचे सांगत महापालिका आयुक्त राजेश नार्वेकर यांनी निश्चय केला, नंबर पहिला हे ध्येय साध्य करण्यासाठी अधिक जोमाने काम करूया, असे आवाहन केले.

नवी मुंबई महापालिकेच्या मुख्यालयातील ॲम्फिथिएटरमध्ये आयोजित संकल्प स्वच्छतेचा या विशेष कार्यक्रमावेळी आयुक्त राजेश नार्वेकर यांनी उपस्थित नमुंमपा अधिकारी, कर्मचारी तसेच नागरिक व प्रसार माध्यमांशी संवाद साधला. या वेळी बोलताना त्यांनी स्वच्छ सर्वेक्षण २०२३मध्ये केलेल्या वैशिष्ट्यपूर्ण कामांचा व उपक्रमांचा धावता आढावा घेतला.

यामध्ये स्वच्छताकर्मींना एक दिवस त्यांच्या साफसफाईच्या कामापासून सुटी देऊन दोन ते तीन हजार नागरिकांनी एकत्र येत त्यांचे सफाईचे काम वेगवेगळ्या दिवशी वेगवेगळ्या विभागात केले. या उपक्रमाचा विशेष उल्लेख आयुक्तांनी केला. नवी मुंबईच्या यशात नवी मुंबई मनपा अधिकारी, कर्मचारीवृंदाप्रमाणेच येथील स्वच्छताप्रेमी नागरिक, लोकप्रतिनिधी, विविध क्षेत्रातील स्वयंसेवी संस्था, उद्योजक, व्यावसायिक, महिला, ज्येष्ठ नागरिक, विद्यार्थी, तृतीयपंथी नागरिक, प्रसारमाध्यमे अशा सर्व घटकांचा महत्त्वाचा वाटा असल्याचे आयुक्तांनी नमूद केले. स्वच्छ नवी मुंबई मिशनचे ब्रँड ॲम्बेसेडर सुप्रसिद्ध संगीतकार, गायक पद्मश्री शंकर महादेवन यांच्यामार्फत स्वयंस्फूर्तीने केल्या जाणाऱ्या निरपेक्ष सहकार्याचा विशेष उल्लेख त्यांनी केला.

स्वच्छताविषयक उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या व्यक्ती, संस्था यांना 'स्वच्छश्री' पुरस्काराने सन्मानित करण्याचा मनोदय आयुक्तांनी व्यक्त केला. स्वच्छता उपक्रमांमध्ये जनसहभागाची व्याप्ती वाढवून एनसीसी व एनएसएस विद्यार्थ्यांचा मोठया प्रमाणावर सहभाग घेतला जाणार असल्याचे त्यांनी सांगितले.




# पनवेलमध्ये हळदीकुंकू समारंभ उत्साहात

**पनवेल : वार्ताहर**

लायन्स क्लब ऑफ पनवेल सरगम आणि श्री सद्गुरू केटरर्स यांचे संयुक्त विद्यमाने पनवेल शहरातील गोखले सभागृहात हळदीकुंकू समारंभ आयोजित करण्यात आला होता.

या कार्यक्रमाला ममता म्हात्रे, माधुरी गोसावी, गीता पाटील, संजीवनी खिलारे, लायन्स डिस्ट्रिक्टच्या आशा शर्मा, कीर्ती सूर्यवंशी, ज्योती नार्वेकर, मीना थरवानी तसेच पनवेल, नवीन पनवेल, खारघर कोपरा येथील महिला लायन सभासद आणि परिसरातील महिला मोठ्या संख्येने उपस्थित होत्या. लायन्स पनवेल सरगमच्या अध्यक्ष स्वाती गोडसे आणि श्री सद्गुरू केटरर्सच्या सुरभी पेंडसे यांचेबरोबरीने सरगम क्लबच्या संविदा पाटकर, मानदा पंडित, मधुरा राजीव, शैला पाटील आदींनी हा कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी परिश्रम घेतले.



# रामशेठ ठाकूर महाविद्यालयात कॅपिटल मार्केटवर व्याख्यान



**खारघर : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे खारघर येथील रामशेठ ठाकूर वाणिज्य व शास्त्र महाविद्यालयात सोमवारी (दि.१२) अकाउंट व फायनान्स व वाणिज्य संघटना यांच्या संयुक्त विद्यमाने कॅपिटल मार्केटवर व्याख्यानाचे आयोजन केले होते.

या व्याख्यानासाठी प्रमुख वक्ते म्हणून प्रा. डॉ. पंकज पंडागळे टि. के. टोपे महाविद्यालय, परेल मुंबई यांनी उपस्थित राहून अकाउंट व फायनान्स तसेच वाणिज्य शाखेतील तृतीय वर्षाच्या विद्यार्थ्यांना भांडवली बाजार त्यासंदर्भामध्ये गुंतवणूक, इक्विटी, सेक्युरिटी ॲण्ड एक्सचेंज कमिशन तसेच प्राथमिक व प्रारंभी ऑफर याविषयी मार्गदर्शन केले व त्यांच्या शंकांचे निरीक्षण केले. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. रूपेंद्र गायकवाड यांनी अकाउंट व फायनान्स तसेच वाणिज्य शाखेतील विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

या व्याख्यानाचे आयोजन प्रा. प्रवर शर्मा व प्रा. राहुल कांबळे यांनी केले तसेच प्रा. करिश्मा कडव, प्रा. तनुजा सुमन, प्रा. योगिता पाटील, प्रा. डॉ. महादेव चव्हाण, प्रा. शिल्पा पाटील, प्रा. मनोज यादव, प्रा. प्रमोद वाघे, प्रा. नम्रता पारीक तसेच शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी उपस्थित राहून सहकार्य केले.

# रामभक्तांसाठी भाजपतर्फे अयोध्या यात्रा

**कर्जत : प्रतिनिधी**

अयोध्येमध्ये साकारलेले प्रभू श्री रामाचे भव्य दिव्य मंदिर आपल्या मतदारसंघातील रामभक्तांनी तेथे जाऊन पहावे व मूर्तीचे दर्शन घेतले पाहिजे यासाठी भाजपने पुढाकार घेतला पाहिजे. मावळ लोकसभा मतदारसंघ अंतर्गत सहा विधानसभा मतदारसंघांतील रामभक्त अयोध्येकडे रवाना झाले आहेत.

पुणे येथून अयोध्येसाठी एक विशेष गाडी सोडण्यात आली. पुणे जिल्ह्यातील तीन विधानसभा मतदारसंघांतील ६५७ रामभक्त हे आस्था विशेष गाडीने रवाना झाले. त्या विशेष गाडीमधून रायगड जिल्ह्यातील कर्जत, पनवेल, उरण विधानसभा मतदारसंघातील ७६८ रामभक्त अयोध्येसाठी रवाना झाले आहेत. या सर्व रामभक्तांना पनवेल येथे भाजपचे मावळ लोकसभा निवडणूक प्रमुख आमदार प्रशांत ठाकूर, कर्जतचे माजी आमदार सुरेश लाड आणि भाजप जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी यांनी शुभेच्छा दिल्या. या अयोध्या वारीसाठी रामभक्तांची पनवेल येथून निघाल्यापासून गाडीमधील प्रवास, भोजन, नाश्ता, चहा यांची व्यवस्था करण्यात आली आहे, तर अयोध्या येथे मंदिरातील दर्शनाची व्यवस्थादेखील करण्यात आली असून १२ फेब्रुवारी रोजी मावळ लोकसभा मतदारसंघातून अयोध्येकडे निघालेले रामभक्त हे रामलल्लाचे दर्शन घेणार आहेत, तर संध्याकाळी शरयू नदीच्या तीरावर आरतीसाठी उपस्थित राहणार आहेत. १३ फेब्रुवारी रोजी सायंकाळी हे सर्व रामभक्त पुन्हा एकदा प्रयाण करतील.




रामभक्तांच्या सोबत भाजपचे प्रमुख पदाधिकारीदेखील अयोध्या दर्शन करणार आहेत. या अयोध्या वारीचे प्रमुख भाजपचे उत्तर रायगड जिल्हा सरचिटणीस दीपक बेहेरे असून जिल्हा उपाध्यक्ष वसंत भोईर, महिला मोर्चा प्रदेश सचिव मृणाल खेडकर तसेच काळसेकर, काशिनाथ पारटे, कर्जत तालुका सरचिटणीस वसंत महाडिक आणि सोशल मीडिया संयोजक ॲड. गायत्री परांजपे हे सोबत आहेत. या वारीमध्ये प्रामुख्याने कारसेवक, वारकरी, भजनी कलावंत, गायक, कीर्तनकार, वकील, बजरंग दल, विश्व हिंदू परिषदेचे कार्यकर्ते तसेच विचारवंत सहभागी झाले आहेत. या महिन्यात अशाच स्वरूपात आणखी तीन गाड्या अयोध्येकडे रवाना होणार आहेत, अशी माहिती भाजपकडून देण्यात आली.

## नांदगाव येथे वृद्धाश्रम, अनाथाश्रमाचे भूमिपूजन

**मुरुड : प्रतिनिधी**

श्रीगुरू सावर्डेकर महाराज संस्थापित रूद्ररेवा सेवा प्रतिष्ठान, आळंदी अंतर्गत श्री गुरूमाता सेवाश्रम नांदगाव श्री सिद्धीविनायक मंदिरासमोर विनामूल्य वृद्धाश्रम आणि अनाथाश्रम या सेवा प्रकल्पाचा शिलान्यास समारंभ नुकताच मोठ्या उत्साहात व भक्तीमय वातावरणात झाला.

श्री गुरूमाता सेवाश्रम नांदगाव येथे समाजातील अनाथ, निराधार, गरजू, गरीब, वृद्धांसाठी व बालकांसाठी प्रेमाचे, आपुलकीचे, हक्काचे आणि विनामूल्य आश्रयस्थान निर्माण होत आहे. त्याचप्रमाणे श्री विठ्ठल गुरूकुलम या नावाने संस्कारक्षम व आदर्श समाज निर्मितीसाठी संस्कृत, गीता, भागवत, रामायण, कीर्तन, प्रवचन, आगमोक्त परंपरागत यज्ञ पाठशाळा इत्यादी शिक्षण देणारी विनामूल्य वारकरी शिक्षण संस्था निर्माण होणार आहे.



या सेवा प्रकल्पाच्या भूमिपूजनावेळी नांदगाव मजगाव पंचक्रोशीतील सज्जन, माय-बहिणी उपस्थित होत्या. श्री गुरूमाता सेवाश्रमाच्या उत्सव समिती व संचालक समितीच्या सर्व मान्यवरांनी उत्तम प्रकारे कार्यक्रम यशस्वी केला. या कार्यक्रमासाठी असंख्य भाविकही मोठ्या संख्येने उपस्थित होते. सर्वांनी समाधान व्यक्त केले.

## पोलादपुरात स्वामी समर्थ पालखीचे आगमन

**पोलादपूर : प्रतिनिधी**

शहरातील छत्रपती शिवाजीनगर भागात मंगळवारी (दि. १३) सायंकाळी ५.३० वाजता अक्कलकोट येथील स्वामी समर्थ महाराज पालखीचे आगमन होत असून यानिमित्त विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आल्याचे स्वामीभक्त कांचन शरद बुटाला व स्वामीभक्त प्रसन्न शरद बुटाला तसेच स्वामीभक्त मंडळींनी कळविले आहे.

मंगळवारी सायंकाळी ५.३० ते ६.३० वाजेपर्यंत छत्रपती शिवाजी महाराजांच्या अश्वारूढ पुतळयापासून शिवाजीनगर भागातील निवासस्थानापर्यंत श्रीस्वामी समर्थांच्या पालखीची मिरवणूक, ७.३० ते ८ वाजेपर्यंत महाआरती, रात्री ८ ते १० स्वामी गुणगान लाईव्ह शो आदर्श संगीत ॲकेडमी, रात्री १० ते ११ वाजेपर्यंत स्वामीभक्तांचे सुस्वर भजन आणि यादरम्यान स्वामीभक्तांसाठी अल्पोपहार आणि बुधवारी (दि. १४) छत्रपती शिवाजीनगर निवासस्थानाजवळील स्वामी समर्थ मंदिरामध्ये स्वामी समर्थ अभिषेक सकाळी ५.३० ते ७ वाजेपर्यंत आयोजित करण्यात आला आहे.

या सर्व उपक्रमांमध्ये स्वामीभक्त परिवाराने मोठया संख्येने उपस्थित राहून श्रीस्वामी सेवेचा लाभ घेण्याचे आवाहन स्वामीभक्त कांचनताई बुटाला आणि प्रसन्न बुटाला यांनी केले आहे.

## मोर अन् लहानग्याची अनोखी दोस्ती

**पाली : प्रतिनिधी**

रायगड जिल्ह्यातील भिरा-आदिवासीवाडीमध्ये राहणाऱ्या दहा वर्षाच्या लहानग्या मुलाची एका मोरासोबत अनोखी दोस्ती झाली आहे. हा दोस्त त्या लहानग्यासोबत सर्वत्र बिनधास्त फिरतो, बागडतो. शिवाय जेवणदेखील सोबतच घेतो. या अनोख्या दोस्तीची पंचक्रोशीत चर्चा आहे.

ज्ञानेश्वर भाऊ पवार इयत्ता पाचवीत टाटा विद्यालय, भिरा या शाळेत शिकणारा विद्यार्थी आपल्या आई वडिलांसोबत जवळच असणाऱ्या भिरा-आदिवासीवाडीमध्ये तो राहतो. वडील मजुरी करतात, तर आई बकऱ्यांचा सांभाळ करून संसाराला हातभार लावते. स्थानिक शिक्षक राम मुंडे यांनी सांगितले की, एके दिवशी त्याची आई जंगलात बकऱ्या चारण्यासाठी घेऊन गेली तेव्हा त्यांना मोराचे एक पिल्लू आढळून आले. कदाचित ते पिल्लू आपल्या आई व भावंडापासून भरकटले असावे. त्या पिल्लाला त्यांनी घरी आणले व त्याचे संगोपन केले. त्या पिल्लाचा ज्ञानेश्वरला जास्त लळा लागला. हळूहळू त्या दोघांत मैत्रीचे एक घट्ट नाते तयार झाले. ज्ञानेश्वर जिथे जाईल तेथे मोर त्याच्यासोबत असते. सध्या क्रिकेट खेळण्यासाठी वाडीतील मुले जवळच असणाऱ्या मैदानावर जातात. त्यांच्यात ज्ञानेश्वर शाळा सुटल्यानंतर खेळण्यासाठी सहभागी होत असतो. ज्ञानेश्वरसोबत हे मोराचे पिल्लू मैदानावर त्याच्या मागोमाग फिरत असते. वाडीतील इतर मुलेदेखील तेथे असतात, पण इतर मुलांकडे न जाता फक्त ज्ञानेश्वरच्या पाठोपाठ आणि सोबत हे पिल्लू बागडत असते. राम मुंडे यांनी मोर व ज्ञानेश्वरच्या अनोख्या दोस्तीचा व्हिडीओ सोशल मीडियावर अपलोड केला आहे.



दरम्यान, जेव्हा अशा प्रकारची मोराची पिल्ले मोठी होतात आणि विणीच्या हंगामात जंगलातून इतर मोरांचे किंवा लांडोरीचे आवाज येतात तेव्हा ही पिल्ले जंगलात निघून जातात. अशा प्रकारच्या अनेक घटना मी गेली १० वर्ष झाली पाहतोय, असे राम मुंडे यांनी सांगितले.

**एकीकडे बऱ्याच ठिकाणी शिकारीचे प्रमाण वाढले असताना अशा प्रकारे आदिवासीवाडीतील मुलांमध्ये मोराचे पिल्लू अगदी त्यांच्या मित्राप्रमाणे वावरत असते. विशेष म्हणजे त्याला सुरक्षिततेची हमी असल्याने ते मुक्तपणे वावरत असते हे चित्र खूप सुखद आहे.**

**-राम मुंडे, शिक्षक, निसर्ग व पशुपक्षी अभ्यासक**

## ऑपरेशन नन्हे फरिश्ते अंतर्गत ९५८ मुलांची सुटका

**रोहे : प्रतिनिधी**

रेल्वे सुरक्षा बलाकडे रेल्वे मालमत्ता, प्रवासी क्षेत्र आणि प्रवाशांच्या सुरक्षेची जबाबदारी सोपवण्यात आली आहे. ऑपरेशन नन्हे फरिश्ते अंतर्गत मुलांना गैरप्रकारांपासून वाचवण्याची जबाबदारीही ते योग्य पध्दतीने पार पाडत आहे. मध्य रेल्वेच्या रेल्वे सुरक्षा बलाने ऑपरेशन नन्हे फरिश्तेअंतर्गत एप्रिल २०२३ ते जानेवारी २०२४ या कालावधीत सरकारी रेल्वे पोलिस (जीआरपी) आणि इतर फ्रंटलाइन रेल्वे कर्मचाऱ्यांच्या समन्वयाने ६५५ मुले आणि ३०३ मुलींसह ९५८ मुलांची मध्य रेल्वेवरील रेल्वे स्टेशन फलाटांवरून सुटका केली आहे. यामध्ये चाइल्डलाईन सारख्या स्वयंसेवी संस्थेच्या मदतीने त्या बालकांचे त्यांच्या पालकांशी पुनर्भेट घडवून आणली आहे.

काही भांडणामुळे, काही कौटुंबिक समस्यांमुळे, उच्च चांगल्या जीवन पध्दती किंवा शहराचे ग्लॅमर इत्यादींच्या शोधात आपल्या कुटुंबियांना न सांगता रेल्वे स्थानकावर येणारी मुले प्रशिक्षित रेल्वे सुरक्षा बलाच्या (आरपीएफ) जवानांच्या निदर्शनास येत असतात. हे प्रशिक्षित आरपीएफ कर्मचारी मुलांशी संपर्क साधतात. त्यांच्या समस्या समजून घेतात. त्यांना त्यांच्या पालकांशी पुन्हा एकत्र येण्यासाठी सल्ला देतात. रेल्वेच्या या उदात्त सेवेबद्दल अनेक पालक त्यांचे मनापासून आभार आणि कृतज्ञता व्यक्त करतात.

मध्य रेल्वेवर एप्रिल २०२३ ते जानेवारी २०२४ दरम्यान सुटलेल्या मुलांचे विभागनिहाय आकडेवारी पहाता मध्य रेल्वेच्या मुंबई विभागाने सर्वाधिक २८९ मुलांची सुटका केली असून त्यात १७५ मुले आणि ११४ मुलींचा समावेश आहे.

भुसावळ विभागाने २७० मुलांची सुटका केली त्यात १६९ मुले आणि १०१ मुलींचा समावेश आहे. पुणे विभागाने २०६ मुलांची सुटका केली असून त्यात १९८ मुले आणि ८ मुलींचा समावेश आहे. नागपूर विभागाने १३२ मुलांची सुटका केली असून त्यात ७६ मुले आणि ५६ मुलींचा समावेश आहे. सोलापूर विभागाने ६१ मुलांची सुटका केली असून त्यात ३७ मुले आणि २४ मुलींचा समावेश आहे.मध्य रेल्वेच्या आरपीएफने जानेवारी २०२४ मध्ये ३५ मुले आणि २१ मुलींसह ५६ मुलांची सुटका केली आहे. त्यापैकी एकट्या मुंबई विभागात २७ मुलांची सुटका करण्यात आली आहे.



## पनवेल महानगरपालिका

### जाहीर नोटीस सूचना

महाराष्ट्र (नागरी क्षेत्र) झाडांचे जतन अधिनियम १९७५ च्या महाराष्ट्र अधिनियमानुसार केलेल्या सुधारणा विचारात घेऊन उक्त अधिनियम कलम ८(३) अन्वये या नोटीसीद्वारे असे जाहीर करण्यात येते की

| अ.क्र. | अर्जदाराचे नाव व पत्ता | झाडांचा प्रकार व संख्या | झाडे तोडण्याचे कारण |
|---|---|---|---|
| | Satyam Ventures Private Limited, Plot No-29,Sector -2, koparkherane, Navi Mumbai Thane 400709 | ०१ रेन ट्री झाड ताडणे. | पनवेल महानगरपालिका हद्दीतील फायनल प्लॉट क्र.१, सेक्टर २ खारघर, नवी मुंबई या भूखंडामध्ये ०१ झाड असुन, ते झाडे धोकादायक पडण्याच्या अवस्थेत तसेच झुकलेले आहे. तरी सदर झाडे तोडण्यास परवानगी द्यावी. |

सदर प्रस्तावास वृक्ष तोडण्याची परवानगी देण्याचा वृक्ष प्राधिकरणाचा इरादा आहे. याबाबत नागरिकांच्या काही हरकती अगर सूचना असल्यास ही सूचना प्रसिद्ध झालेपासून ७ दिवसांच्या आत लेखी स्वरूपात पनवेल महानगरपालिकेच्या वृक्ष प्राधिकरण व उद्यान विभागामध्ये सादर कराव्यात. विहित मुदतीत सादर न झालेल्या हरकती अगर सूचनेचा विचार करण्यात येणार नाही याची नोंद घ्यावी.

**पमपा/उद्यान/२१२४/प्र.क्र. १५७/७१/२०२४**
**दिनांक :- १२/०२/२०२४**

**सही/-**
**उपायुक्त**
**पनवेल महानगरपालिका**

## कुळगांव बदलापूर नगरपरिषद

नगरपरिषद दुबे रुग्णालय इमारत, पहिला मजला, आदर्श विद्यामंदिर रोड, बदलापूर रेल्वे स्टेशन (पूर्व), कुळगांव, पिन-४२१५०३. ता. अंबरनाथ जि. ठाणे. ईमेल :- kbmc123@gmail.com वेबसाईट :- http://kbmc.gov.in

### निविदा सुचना

**संदर्भ :- कु.ब.न.प/आरोग्य/६१०/२०२३-२०२४** **दिनांक : १२/०२/२०२४**

कुळगाव-बदलापूर नगरपरिषद हद्दीमध्ये खालील कामांसाठी संस्था/व्यक्ती यांचेकडून निविदा मागविण्यात येत आहे.

| अ. क्र | निविदेचा प्रकार | निविदा फॉर्म फी | इसारा रक्कम | कामाचा कालावधी |
|---|---|---|---|---|
| १. | कुळगाव बदलापूर नगरपरिषद हद्दीतील मोकाट गुरांचा नियमानुसार बंदोबस्त करणे. | ५००/- | ५०००/- | २ वर्ष |

निविदाफॉर्म दिनांक १३/०२/२०२४ ते दिनांक २२/०२/२०२४ पर्यंत नगरपरिषदेच्या आरोग्य विभागात प्राप्त होतील. निविदाफॉर्म फी व निविदा अनामत फी रोखीने / डी.डी. ने भरणेचे आहे. निविदेचे सादरीकरण दिनांक २३/०२ /२०२४ रोजी दुपारी ३.०० वाजेपर्यंत मुख्याधिकारी दालनामध्ये ठेवलेल्या निविदा पेटीमध्ये टाकावयाची आहे.

वरिल प्रक्रियेद्वारे प्राप्त झालेल्या निविदा दिनांक २३/०२/२०२४ रोजी दुपारी ४.०० वा. किंवा अन्य सोयीच्या दिवशी निश्चित होईल त्या दिवशी दालनात उपस्थित संस्थाचे प्रतिनिधी/ कंत्राटदार अथवा अधिकृत प्रतिनिधी समोर उघडण्यात येतील.

कोणतीही निविदा स्विकारणे अथवा नाकारण्याचा अधिकार मुख्याधिकारी, कुळगांव बदलापूर नगरपरिषद यांनी राखून ठेवलेला आहे.

शिक्का

**सही/-**
**मुख्याधिकारी**
**कुळगांव बदलापूर नगरपरिषद**
**कुळगांव**

## पनवेल महानगरपालिका, पनवेल ४१०२०६

### जाहीर नोटीस

सर्व संबंधितांना या नोटीशीद्वारे कळविण्यात येते की, खालील परिशिष्टामध्ये नमूद केलेली मिळकत पनवेल महानगरपालिकेच्या मंजुर विकास योजनेतील आरक्षणातील रस्त्याने बाधीत क्षेत्र पनवेल महानगरपालिका सदर मिळकतीच्या हितसंबंधीतांकडून हस्तांतरणीय विकास हक्काच्या (टी.डी. आर) बदल्यात ताब्यात घेत आहे. सदरील मिळकत निर्वेध व निजाखीम असल्याचा भरवसा सदर मिळकतीच्या हितसंबंधीतांनी पनवेल महानगरपालिकेस दिला आहे.

खालील नमूद मिळकतीवर खालीलप्रमाणे जमीन मालकांशिवाय अन्य कोणाचाही अन्न, वस्र, गहाण, दान, बक्षीस, खरेदी, पोटगी, लीज, लीन, चार्ज, इजमेंट अथवा कोणत्याही प्रकारचा हक्क वा हितसंबंध असल्यास संबंधितांनी प्रस्तुतची नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १५ (पंधरा) दिवसांच्या आत उपसंचालक, नगररचना, पनवेल महानगरपालिका पनवेल ४१० २०६ यांच्या कार्यालयात कार्यालयीन दिवशी व वेळेत येऊन मुळ कागदपत्रांसह आपली हरकत लेखी स्वरूपात द्यावी. सदर मुदतीत कोणचीही कोणत्याही प्रकारची हरकत न आल्यास खालील मिळकतीवर कोणाचाही कसलाही हक्क वा हितसंबंध नाही असे समजून किंवा असल्यास संबंधिताने तो जाणूनबुजून सोडून दिला आहे, असे समजून पनवेल महानगरपालिका जमीन ताब्यात घेईल व सदर जमिनीचा मोबदला टी.डी. आर च्या स्वरूपात खालील जमीनमालकास अदा केला जाईल, त्यानंतर येणाऱ्या कोणत्याही तक्रारींची दखल घेतली जाणार नाही याची कृपया नोंद घ्यावी.

परिशिष्ट १) मिळकतीचे वर्णन : तुकडी पनवेल, पोट तुकडी पनवेल येथील तसेच पनवेल महानगरपालिका हद्दीतील मौजे पनवेल मे. निलकंठ असोसिएट्स तर्फे भागीदार हर्ष किशोर गुप्ते यांचे मालकीच्या जमीन मिळकतीमधील प्रस्तावित ९.१५ मी. रुंदीच्या रस्त्याने बाधीत क्षेत्र पुढीलप्रमाणे :-

१) न. भू. क्र. १३२९ क्षेत्र २४०.८४ चौ. मी. त्यापैकी रस्त्यासाठी बाधीत क्षेत्र ९८.५७ चौ. मी.
२) न. भू. क्र. १३२९/१ क्षेत्र ६१४.८४ चौ. मी. त्यापैकी रस्त्यासाठी बाधीत क्षेत्र १५५.५७ चौ. मी.
३) न. भू. क्र. १३२९/२ क्षेत्र २९०.३४ चौ. मी. त्यापैकी रस्त्यासाठी बाधीत क्षेत्र ४५.३१ चौ. मी.
४) न. भू. क्र. १३२९/३ क्षेत्र १४४.११ चौ. मी. त्यापैकी रस्त्यासाठी बाधीत क्षेत्र ३८.८९ चौ. मी.
असे प्रस्तावित विकास योजनेतील ९.१५ मी. रस्त्यासाठी एकूण बाधीत क्षेत्र ३३८.३४ चौ. मी.

त्यास चतुःसीमा खालीलप्रमाणे -

पर्वेस : ९.१५ मी. डी. पी. रोड
पश्चिमेस : ९.१५ मी. डी. पी. रोड
दक्षिणेस : न. भू. क्र. १३३०/१ व न. भू. क्र. १३३१
उत्तरेस : ९.१५ मी. डी. पी. रोड

टिप: उक्त जागा दर्शविणारा नकाशा पाहणीसाठी नगररचना विभागात ठेवण्यात आला आहे.

**सही/-**
**( ज्योती कवाडे)**
**उपसंचालक नगररचना**
**पनवेल महानगरपालिका**

जा.क. - पमपा/नरवि/टिडीआर/२६-२४/३२७/२०२४, दि.१२/०२/२०२४
टिप - सदरची जाहीर नोटीस पनवेल महानगरपालिकेच्या www.panvelcorporation.com या वेबसाईटवर प्रसिध्द करण्यात आलेली आहे.

## पनवेल महानगरपालिका, पनवेल ४१०२०६

### जाहीर नोटीस

सर्व संबंधितांना या नोटीशीद्वारे कळविण्यात येते की, खालील परिशिष्टामध्ये नमूद केलेले मिळकत पनवेल महानगरपालिकेच्या मंजुर विकास योजनेतील आरक्षणातील रस्त्याने बाधीत क्षेत्र तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम २०५, २०६ व २०९ अन्वये अंतिम केलेल्या रस्त्याने बाधित क्षेत्र पनवेल महानगरपालिका सदर मिळकतीच्या हितसंबंधीतांकडून हस्तांतरणीय विकास हक्काच्या (टी.डी.आर) बदल्यात ताब्यात घेत आहे. सदरील मिळकत निर्वेध व निजाखीम असल्याचा भरवसा सदर मिळकतीच्या हितसंबंधीतांनी पनवेल महानगरपालिकेस दिला आहे.

खालील नमूद मिळकतीवर खालीलप्रमाणे जमीन मालकांशिवाय अन्य कोणचाही अन्न, वस्त्र, गहाण, दान, बक्षीस, खरेदी, पोटगी, लीज, चार्ज, इजमेंट अथवा कोणत्याही प्रकारचा हक्क वा हितसंबंध असल्यास संबंधितांने प्रस्तुतची नोटीस प्रसिध्द झाल्यापासुन १५ दिवसाच्या आत उपसंचालक, नगररचना, पनवेल महानगरपालिका पनवेल ४१०२०६ यांच्या कार्यालयात कार्यालयीन दिवशी व वेळेत येऊन मुळ कागदपत्रांसह आपली हरकत लेखी स्वरूपात द्यावी. सदर मुदतीत कोणचीही कोणत्याही प्रकारची हरकत न आल्यास खालील मिळकतीवर कोणचाही कसलाही हक्क वा हितसंबंध नाही असे समजुन किंवा असल्यास संबंधीताने तो जाणूनबुजून सोडुन दिला आहे असे समजून पनवेल महानगरपालिका जमिन ताब्यात घेईल व सदर जमिनीचा मोबदला टि डी आर च्या स्वरूपात खालील जमीनमालकास अदा केला जाईल, त्यानंतर येणाऱ्या कोणत्याही तक्रारींची दखल घेतली जाणार नाही याची कृपया नोंद घ्यावी.

परशिष्ट १) मिळकतीचे वर्णन तुकडी पनवेल, पोट तुकडी पनवेल येथील तसेच पनवेल महानगरपालिका हद्दीतील मौजे पनवेल येथील मे.क्लिफ डेव्हलपर्स प्रा. लि. तर्फे डायरेक्टर श्री. अनिलकुमार नंदलाल मेहता यांचे मालकीच्या जमिन मिळकतीमधील प्रस्तावित १२.२० मी. रुंदीच्या रस्त्याने बांधीत क्षेत्र पुढीलप्रमाणे

**१) सर्व्हे क. ४८६ हिस्सा क्र. अ** क्षेत्र ५४१४ चौ.मी. त्यापैकी रस्त्यासाठी बाधीत क्षेत्र ८१८ चौ.मी.
**२) सर्व्हे क. ४८६ हिस्सा क्र. क** क्षेत्र १४०६८ चौ.मी. त्यापैकी रस्त्यासाठी बाधीत क्षेत्र ३०२२ चौ.मी.
**३) सर्व्हे क. ४८६ हिस्सा क्र. ड** क्षेत्र १८१६ चौ.मी. त्यापैकी रस्त्यासाठी बाधीत क्षेत्र १८१६ चौ.मी.
असे प्रस्तावीत योजनेतील १२.२० मी. रस्त्यासाठी एकुण बाधीत क्षेत्र ५६५६ चौ.मी.

त्यास चतुःसिता खालीलप्रमाणे-

पुर्वेस : - सर्व्हे क्र. ७९७ पार्ट
पश्चिम :- सर्व्हे क्र. ४८७ पार्ट व सर्व्हे क. ४८८ पार्ट
दक्षिणेस :- सर्व्हे क्र. ७९७ पार्ट
उत्तरेस :- सर्व्हे क्र. ७८८ पार्ट

टिप: उक्त जागा दर्शविणारा नकाशा पाहणीसाठी नगररचना विभागात ठेवण्यात आला आहे.

**सही/-**
**( ज्योती कवाडे)**
**उपसंचालक नगररचना**
**पनवेल महानगरपालिका**

जा.क. - पमपा/नरवि/टिडीआर/२६-२४/३२८/२०२४, दि.१२/०२/२०२४
टिप - सदरची जाहीर नोटीस पनवेल महानगरपालिकेच्या www.panvelcorporation.com या वेबसाईटवर प्रसिध्द करण्यात आलेली आहे.

## नमो कुस्ती महाकुंभाला कुस्तीप्रेमींचा जनसागर

# शेख 'सिकंदर' अन् चौधरीचा 'विजय'







**जामनेर : प्रतिनिधी**

नाद कुस्तीचा, प्रण व्यसनमुक्तीचा असा जयघोष करीत नमो कुस्ती महाकुंभात खानदेशातील लाखो प्रेक्षकांनी कुस्तीचा थरार याची देही अनुभवला. मुंगी शिरायलाही जागा नसलेल्या जामनेरच्या स्टेडियममध्ये सोलापूरचा सिकंदर शेख, सायगावचा विजय चौधरी आणि पंजाबच्या प्रीतपालच्या कुस्तीचा मनमुराद थरार कुस्तीप्रेमींना तब्बल सात तास घेतला.

कुस्तीच्या जनसागरात तब्बल सात तास चाललेल्या या कुस्ती दंगलमध्ये सोलापूरचा सिकंदर शेखने जम्मू काश्मीरच्या बिनिया मिनला छडी टांग लावत अस्मान दाखविले. या कुस्तीसाठी पंच म्हणून स्वतः ग्रामविकास मंत्री गिरीश महाजन हे होते. सायगावच्या विजय चौधरी विरुद्ध मुस्तफा खान या अटीतटीच्या लढतीत मुस्तफाला विजयने घुटना डावावर चितपट केले. या वेळी संपूर्ण स्टेडियममधील प्रेक्षकांनी उभे राहून आपल्या भागातील खेळाडूचा जयघोष केला.

कुस्ती महाकुंभात प्रेक्षकांना एकापेक्षा एक लढतींचा थरार रंगला. पंजाबच्या प्रितपालने दिल्लीच्या संती कुमारला भारली या डावावर अवघ्या दोन मिनिटांत गारद केले. असाच जोरदार खेळ माऊली कोकाटेने करून दाखवला. त्याने उत्तर भारतातील तगडा पैलवान अजय गुज्ञरला टांग डावावर चीतपट करून प्रेक्षकांची मने जिंकली. प्रकाश बनकर वि. भूपिंदर सिंह ही कुस्ती बराच वेळ चालली. त्यामुळे मंत्री गिरीश महाजन यांनी ही कुस्ती बरोबरीत सोडवली. हरयाणाच्या कृष्णकुमारने पंजाबच्या हॅप्पी सिंगला चितपट केले. बालारफिक शेखने पंजाबच्या मनप्रीतला पोकळ घिस्सा डावावर धूळ चारली.

माऊली जमदाडे आणि जतींदर सिंह यांच्यातील संघर्षही संपता संपत नव्हता. दोघेही तोडीस तोड असल्याने ही कुस्ती बरोबरीत सोडविण्यात आली. बाबर पैलवानवर मोनू खुराणाने मात केली. सत्येंद्र मलिकने काका जम्मूला चितपट केले. महाराष्ट्राच्या समीर शेखने कलवा गुज्ञरला हरवले, तर महेंद्र गायकवाडने मनजीत खत्रीला अस्मान दाखवले. कमलजित धुमचडीने गुरजन्नतला हरवण्याची किमया साधली. विलास डोईफोडने प्रेक्षणीय संघर्षात प्रवीण भोलाला चितपट करून प्रेक्षकांची मने जिंकली. पंजाबच्या कमल कुमारने मध्यप्रदेशच्या रेहान खानला पराभूत केले.

या मैदानात १५० मल्लांनी आपल्या खेळाचे प्रदर्शन करून कुस्तीप्रेमींची मने जिंकली. या सर्व विजेत्या पैलवानांना मंत्री गिरीश महाजन यांनी १५ गदा, मानाचा नमो कुस्ती महाकुंभचा पट्टा आणि लाखोंचे बक्षिसे देऊन गौरविले. या मैदानासाठी पंच राजा पैलवान, सत्यदेव मलिक उपस्थित होते. हे मैदान पार पाडण्यासाठी संयोजक रोहित पटेल, विजय चौधरी, दत्तात्रय जाधव, वेंकटेश अहिरराव, दत्तू माळी, यशोदीप चौधरी यांनी काम पहिले.

# रामशेठ ठाकूर कॉलेजचे आंतर महाविद्यालयीन हॅण्डबॉल स्पर्धेत यश

**खारघर : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे खारघर येथील रामशेठ ठाकूर वाणिज्य व शास्त्र महाविद्यालयाच्या विद्यार्थिनींनी आंतर महाविद्यालयीन हॅण्डबॉल स्पर्धेत द्रितीय क्रमांक पटकाविला आहे. ही स्पर्धा खांदा कॉलनीतील चांगू काना ठाकूर महाविद्यालयाने आयोजित केली होती.

रामशेठ ठाकूर महाविद्यालय विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी वेगवेगळे उपक्रम घेत असते. त्यातून महाविद्यालयातील विद्यार्थिनींनी आंतर महाविद्यालयीन हॅण्डबॉल स्पर्धेत भाग घेऊन द्रितीय क्रमांक पटकाविला यशस्वी संघामध्ये मेघना जैन, पूजा सोलंकी, पूजा यादव, स्नेहा, नेहा प्रांजल मलनगावे, प्रगती मिश्रा, समीक्षा, अक्षता घेरडे या विद्यार्थिनींचा सहभाग होता. त्यांना महाविद्यालयातील जिमखाना प्रमुख प्रा. प्रथमेश उदेकर, अजिंक्य भगत (फिजिकल डायरेक्ट) तसेच सर्व प्राध्यापकवृंद यांचे मार्गदर्शन लाभले.




या यशाबद्दल संस्थेचे चेअरमन, माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर, आमदार प्रशांत ठाकूर, संस्थेचे अध्यक्ष अरुणशेठ भगत, व्हाईस चेअरमन चेअरमन वाय. टी. देशमुख, सचिव डॉ. एस. टी. गडदे, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. रूपेंद्र गायकवाड यांनी सर्व विद्यार्थिनींचे अभिनंदन केले व पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

# 'सीकेटी'त आंतरशालेय थ्रो बॉल स्पर्धा उत्साहात



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

कष्टकऱ्यांचे द्रष्टे नेते व थोर समाजसुधारक कै. जनार्दन भगत यांच्या ९६व्या जयंतीनिमित्त चांगू काना ठाकूर (सीकेटी) माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयाच्या वतीने तालुकास्तरीय शालेय थ्रो बॉल स्पर्धेचे आयोजन नुकतेच करण्यात आले होते. या स्पर्धेत पनवेल तालुक्यातील १३ संघ सहभागी झाले होते.

स्पर्धेचे उद्घाटन माजी नगरसेवक तेजस कांडपिळे यांच्या हस्ते झाले. उद्घाटन समारंभास प्रमुख पाहुणे म्हणून रायगड जिल्हा थ्रो बॉल असोसिएशनचे सेक्रेटरी विलास मोरे, पनवेल महापालिका क्रीडा अधिकारी नामदेव पिचड यांची उपस्थिती लाभली. त्याचप्रमाणे सीकेटी मराठी माध्यमिक विभागाचे मुख्याध्यापक कैलास सत्रे, उच्च माध्यमिक विभागाचे प्राचार्य प्रशांत मोरे, इंग्रजी माध्यमिक विभागाचे मुख्याध्यापक संतोष चव्हाण, प्राथमिक मराठी विभागाचे मुख्याध्यापक सुभाष मानकर, प्राथमिक इंग्रजी विभागाच्या मुख्याध्यापिका नीलिमा शिंदे, कला व वाणिज्य विभागाचे पर्यवेक्षक अजित सोनवणे, विज्ञान विभागाच्या पर्यवेक्षिका स्वाती पाटील यांच्यासह विद्यालयातील क्रीडा शिक्षक व क्रीडाप्रेमी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

विजेत्या संघांचे जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे चेअरमन माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर, आमदार प्रशांत ठाकूर, व्हाईस चेअरमन वाय.टी. देशमुख, अध्यक्ष अरुणशेठ भगत, सचिव डॉ. एस. टी. गडदे, प्राचार्य प्रशांत मोरे, पर्यवेक्षक अजित सोनवणे, स्वाती पाटील यांच्यासह सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी अभिनंदन केले व पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

**स्पर्धेचा निकाल**

**मुले** : प्रथम क्रमांक चांगू काना ठाकूर माध्यमिक विद्यालय (मराठी), द्रितीय चांगू काना ठाकूर उच्च माध्यमिक विद्यालय (ज्यु. कॉलेज) नवीन पनवेल, तृतीय कारमेल कॉन्व्हेंट हायस्कूल, कळंबोली; **मुली** : प्रथम क्रमांक महात्मा स्कूल ऑफ अकॅडमिक्स ॲण्ड स्पोर्ट्स, द्रितीय कारमेल कॉन्व्हेंट हायस्कूल, कळंबोली, चांगू काना ठाकूर माध्यमिक विद्यालय (इंग्रजी) तृतीय.



# मुख्यमंत्री चषक क्रिकेट स्पर्धेचा रोहा संघ मानकरी

**नागोठणे : प्रतिनिधी**

राज्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या वाढदिवसानिमित्त नागोठणे ग्रामपंचायत हद्दीतील मुरावाडी येथे शिवसेना नागोठणे विभागप्रमुख प्रवीण ताडकर यांच्या सौजन्याने व जय बजरंग क्रिकेट क्लबच्या वतीने आयोजित मुख्यमंत्री चषक टेनिस बॉल क्रिकेट स्पर्धेत ॲड. मनोजकुमार शिंदे यांचा संघ विजेता ठरला.



स्पर्धेत द्रितीय क्रमांक वायजीएस वरवठणे संघ व तृतीय क्रमांक हाशिवरे (अलिबाग) या संघाने मिळविला. विजेत्या संघांना रोख रक्कम व आकर्षक चषक देऊन गौरविण्यात आले. स्पर्धेत मालिकावीर व अंतिम लढतीचा सामनावीर जीवित म्हात्रे (रोहा), उत्कृष्ट फलंदाज ऋतिक माळी (वरवठणे), उत्कृष्ट गोलंदाज म्हणून मनीष मोकल (हशिवरे) यांची निवड करून त्यांना बक्षीस देण्यात आले.

पारितोषिक वितरण समारंभास भाजप नेते किशोर म्हात्रे, गायक रोहित पाटील, शिवसेनेचे तुषार शिंदे, धनंजय पोकळे, रोहा कृषी उत्पन्न बाजार समितीचे माजी सभापती गणपतशेठ म्हात्रे, वरवठणे उपसरपंच विजय पाटील, विक्रांत घासे, शिवसेना उपविभागप्रमुख आकाश मढवी, कोंडगाव माजी सरपंच धर्माशेठ भोपी, पळस उपसरपंच चंद्रकांत भालेकर, किसन बोरकर, भरत गिजे, ज्येष्ठ ग्रामस्थ चंद्रकांत ताडकर, गणपत डाकी, सुधीर पारंगे, सतिश डाकी, ॲड. गणेश जाधव, सामाजिक कार्यकर्ते अजित दळवी, बाळासाहेब वाजे, दीपक सोनवणे, गंगाराम पारंगे, रमेश पारंगे आदींसह ग्रामस्थ व क्रिकेटप्रेमी उपस्थित होते.

## राष्ट्रीय सायकलिंग स्पर्धेत स्नेहल माळीला दोन सुवर्णपदके

**पनवेल : वार्ताहर**

झारखंडमधील रांची येथे नुकत्याच झालेल्या ६७व्या राष्ट्रीय स्कूल ट्रक सायकलिंग स्पर्धेत खारघरची स्नेहल शत्रुघ्न माळी हिने दोन सुवर्णपदके पटकावली आहेत. स्पर्धेत देशभरातून सुमारे ९०० खेळाडू सहभागी झाले होते.



स्नेहल माळीने अंडर १८ वयोगटात वैयक्तिक व टीम सायकलिंगमध्ये पहिली येत दोन सुवर्णपदके प्राप्त केली. या अगोदरही तिने राष्ट्रीय सायकलिंग स्पर्धेत पदके जिंकलेली आहेत. पोलीस निरीक्षक शत्रुघ्न माळी यांची ती कन्या आहे. स्नेहलला सायकलिंग फेडरेशन ऑफ इंडियाचे उपाध्यक्ष प्रताप जाधव, महाराष्ट्र सायकलिंग असोसिएशनचे संजय साठे, फिनिक्स सायकलिंग क्लब पुणेचे प्रशिक्षक दर्शन बारगुजे यांचे मार्गदर्शन लाभले. या यशाबद्दल माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर, आमदार प्रशांत ठाकूर, आमदार मंदा म्हात्रे, माजी सभागृह नेते परेश ठाकूर यांनी स्नेहलचे अभिनंदन केले.

# कबड्डी स्पर्धेत टिटवीचा राजा संघ विजेता

**नागोठणे : प्रतिनिधी**

अलिबाग तालुक्यातील रामराजनजीक असलेल्या सत्तेवाडी गावात नुकतेच जिल्हास्तरीय धनगर समाजाच्या खुल्या गटातील कबड्डी स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धेत मुरूड तालुक्यातील टिटवीचा राजा (ब) संघ मानकरी ठरला.

स्पर्धेत रायगड जिल्ह्याच्या कानाकोपऱ्यातून एकूण २९ संघांनी सहभाग घेत उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. रायगड जिल्हा धनगर समाज सेवाभावी समाज संस्थेचे अध्यक्ष मधुकर ढेबे यांच्या हस्ते स्पर्धेचे उद्घाटन करण्यात आले. त्या वेळी माजी अध्यक्ष जयेश ढेबे, लक्ष्मण ढेबे, प्रसिद्धीप्रमुख सुनील कोकळे, धाऊ केंडे, गजानन झोरे, मंगेश कोकळे, प्रकाश जानकर तसेच समाजबांधव व खेळाडू मोठ्या संखेने उपस्थित होते.



स्पर्धेत द्रितीय क्रमांक टिटवीचा राजा (अ), तृतीय क्रमांक अलिबाग येथील जय बापदेव सत्तेवाडी व चतुर्थ क्रमांक कर्जत तालुक्यातील सोंडाई माता प्रसन्न खैराट या संघाने पटकविला. सर्व विजेत्या संघांना आकर्षक चषक व रोख रक्कम असे पारितोषिक देऊन गौरविण्यात आले.

# श्री छत्रपती शिवाजी महाराज पारंपरिक क्रीडा महाकुंभ

## शरीरसौष्ठव स्पर्धेत सागर कातुर्डे विजेता

**मुंबई : प्रतिनिधी**

श्री छत्रपती शिवाजी महाराज पारंपरिक क्रीडा महाकुंभ स्पर्धेंतर्गत शरीरसौष्ठव श्री स्पर्धा भायखळा येथील अण्णाभाऊ साठे सभागृहात झाली. या स्पर्धेत ११४ शरीरसौष्ठवपटू झाले होते. या स्पर्धेचे वैशिष्ट्य म्हणजे सात दिव्यांग खेळाडूंनी आपले शरीरसौष्ठव प्रदर्शन केले. विविध स्पर्धांमध्ये विजयांचा धडाका लावलेल्या सागर कातुर्डे याने महाकुंभ शरीरसौष्ठव श्री किताबासह सलग नववे विजेतेपद पटकावले. हरमीत सिंग उपविजेता ठरला.

स्पर्धेच्या ७५ किलो गटात संतोष भरमकर (परब फिटनेस) प्रथम, उदय देवरे (शेळके जिम) द्रितीय, गणेश उपाध्याय (बालमित्र) तृतीय; ८० किलो गटात सागर कतूर्डे (इन्कम टॅक्स) प्रथम, अक्षय खोत (परब फिटनेस) द्रितीय, राजेंद्र जाधव (क्रिस्त फिटनेस) तृतीय; ८०+ किलो गटात हरमीत सिंग (परब फिटनेस) प्रथम, प्रणव खातू (यंग दत्ताराम) द्रितीय, अभिषेक माशिलकर (जे ९ फिटनेस) याने तृतीय क्रमांक पटकाविला.

दिव्यांगांमध्ये मेन्स फिजीक १६५वरील गटात मंगेश भोसले (बॉडी वर्कशॉप) प्रथम, हितेश ठाकूर (म साहेब) द्रितीय व रोशन पाटील (पाटील फिटनेस) याने तृतीय क्रमांक प्राप्त केला.









दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. **–मुख्य संपादक**

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया ॲण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे–बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले**. पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०–२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२–२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com